
ज्योती

ईशान्य ओहायो मराठी मंडळाच्या वतीने

# दिपावली अभिष्टचिंतन





नमस्कार,

लालभडक रंगाच्या पानांनी पेटलेली झाडें, एका स्तब्ध नि:शब्द वणव्यासारखी, हळूहळू जळणाऱ्या जंगलासारखी, भगवे कपडे घातलेल्या संन्याश्यांच्या कुंभमेळ्यासारखी. खिडकीतून त्यांच्याकडे पहात, एका रिकाम्या रविवारी मी आपला झगडतोय, पावसानंतरच्या रित्या ढगांसारख्या, आशयात आणि अंतरात रिकाम्या असणाऱ्या अक्षरांशी. संपादकीय लिहीण्याच्या प्रयत्नात या रित्या अक्षरांशी भातुकलीचा खेळ मांडतोय.

अनेक लेखण्यांतून प्रकटलेल्या अन अनावृत्त लावंण्यात नटलेला हा ‘ज्योती’चा दिवाळी अंक आपल्या पर्यंत पोहचविण्याचा आनंद काही वेगळाचं...

तसं बघितलत तर वर्षाच्या एका ठराविक दिवशी सगळ्यांनी सामुहिकरित्या आनंदी होण्याची दिवाळीची कल्पना ही मला फारशी पटत नाही. त्यापेक्षा हरिवंशराय बच्चनच्या ‘मधुशालेत’ म्हंटल्याप्रमाणे
दीनको होली, रात दिवाली
रोज़ मनाये, मधुशाला..
ही दिवाळीची व्याख्या मला जास्त आवडते. ज्या दिवशी आनंद त्या दिवशी दिवाळी!
निराशेने विझलेल्या डोळ्यांमधे आशेचे दिवे जेव्हां मी लावतो, तो दिवस माझ्याकरता दिवाळी!

पण मग आठवतात लहानपणच्या दिवाळीच्या आठवणी...
अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या विखरलेल्या पाकळ्यांसारखी ती दिव्यांची आरास...
सकाळी उटणं लावून थंडीत कुडकुडतं केलेलं ते अभ्यंगस्नान...
चोरुन खाल्लेला फराळं...
हातात फटाके फुटल्यावर भाजलेला हात...
ही चिरंतन आठवणीत राहणारी शिल्पचित्रे म्हणजेच दिवाळी.

आमच्या सर्व वाचकांना आणि लेखकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद

मिलींद




# साठे परिवार

## महाराष्ट्र मंडळाच्या सीमा– अध्यक्षीय मनोगत

काहीतरी चुकतंय. काहीतरी चुकतंय आपलं. मंडळाचे अध्यक्षपद स्विकारल्यानंतर मला दोन–तीन महिन्यातच जाणीव झाली ती सभासदांची यादी पाहून. मंडळामध्ये एकही सेकंड जनरेशन (इथे जन्मलेल्या) कुटुंब नाही? आश्चर्य वाटले तितके वाईटही. त्यातच विजय पराडकर (युथ अध्यक्ष– मैत्रेय) याचा लेख वाचण्यात आला. "उत्तर अमेरिकेमध्ये मराठी संस्कृती धोक्यात आहे कां?" या प्रश्नाचे उत्तर तो "नक्कीच" असे देतो. ह्यावर मैत्रेय बरोबर महाराष्ट्र मंडळांनी काम करावे असे आवाहन त्याने केले.

माझी ह्या वर्षामध्ये खूप मुलांशी ओळख झाली. जाणवले की ही मुले खूप हुषार आहेत. भारतीय संस्कृती बद्दल त्यांना जाण आणि उत्सुकता आहे. पण त्यांच्या राहणीमानामध्ये त्यांना महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमामध्ये नाही गेले तर त्यांना काहीतरी चुकल्यासारखे कधीच वाटत नाही.

मंडळामध्ये आपण होळी, गणपती, दिवाळी ह्यासारखे कार्यक्रम साजरे करतो. आपल्या मनात ह्या सणांबद्दल भारतात ज्या प्रकारे साजरे होतात त्याप्रकारची प्रतिमा असते. त्यामानाने इथे आपल्या पध्दती अगदीच लुटुपुटीच्या असतात. बर्याच वेळा मुले त्यांच्याच खेळात कुठल्यातरी कोपर्यात दंग असतात. अशामुळे त्यांना मंडळाच्या कार्यक्रमाबद्दल कधीच ओढ किंवा आकर्षण वाटत नाही. उदाहरण द्यायचे तर रंगपंचमीच्या वेळी आपण एक दुस–यांना कपाळाला थोडासा रंग लावुन मोकळे होतो. पण लहानपणी आपण सर्व दिवसभर रंगपंचमी खेळत असू. आपण अशाप्रकारचे वातावरण निर्माण करुन त्यात मुलांना सामील केले पाहिजे. ह्यासाठी उचीत जागा शोधणे थोडेसे अवघड असेल पण अशक्य नक्कीच नाही. दिवाळीच्या कार्यक्रमाच्या वेळी रांगोळी, आकाशकंदील, फ़ुलबाज्या आणल्या तर मुलांना त्याचे आकर्षण वाटेल. त्यांच्या स्मृतीमध्ये त्या आठवणी कोरल्या जातील.

शास्त्रीय संगीत, नाटके, सुगम संगीत यासारखे कार्यक्रम मंडळाचे अविभाज्य भाग आहेत आणि राहतील. पण इथे जन्मलेल्या मुलांमध्ये आणि भारतात जन्मलेल्या तरुणांसाठीही तो लांबचा पल्ला आहे. अशासाठी आपण योगा, हायकिंग, कनुईंग, स्कींग यासारखे छोटे छोटे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत, जेणेकरुन ही तरुण पिढी एकत्र येइल, त्यांच्या ओळखी वाढतील आणि पुढे कार्यक्रमालाही हजेरी लावतील.

हे वर्ष माझ्यासाठी खुपच नवे होते. मला खुप काही शिकायला मिळाले. आम्ही बरेच बदल केले. योगासारखे प्राचीन पण नवे कार्यक्रम चालू केले. आश्चर्य म्हणजे योगासनाला दोन/तीन तरुण आणि नवे चेहरे दिसले. त्यांनी पुढच्या वर्षी काम करण्याची इच्छा दर्शवली. ह्या सर्वांना घेऊन मी पुढच्या वर्षी काही नवे कार्यक्रम चालू करणार आहे.

ही वेळ आहे आपल्या सीमांचा विस्तार करण्याची, जुनेच पण नवे करण्याची आणि आपल्या संस्कृतीची जोपासना करण्याची.

विक्रम बेडेकर,
अध्यक्ष, ईशान्य ओहायो महाराष्ट्र मंडळ

## मुक्तछंद

खेळ नियतीचा असा विषेश झाला
देश तो माझा मला परदेश झाला

नाहतो मी सुखाच्या गंगेत आता
त्या सुखाचाही मला क्लेश झाला

वादळे ह्रुदयातली उधळती माझ्या घराला
भावनांचा हा नवा आवेश झाला

पायात टोचणारे काटे सरुन गेले
बोचणाय्रा फुलांचा हा प्रदेश झाला

राख माझी मिळ्वीली जमीनीत जेव्हां
परदेशाचा तो कोपरा स्वदेश झाला

मिलींद देवगांवकर

◆

पहाटेचा काळोख, मशिदीच्या बांगेत थबकला
शिणलेला पहाटतारा, क्षितीजावर हळुच लोपला

रानचाफ्याचा गंध, मातीच्या श्वासात आला
भिजलेल्या संवेदनांचा, मनालाही पूर आला

पेंगणारी तृप्त धरती, थकलेली मेघमाला
निसर्गाची रासक्रीडा, मोहवी माझ्या मनाला

काय हा आभास होता, की पाहीले मी सावलीला
ही कुणाची पाउले, काल आला आज गेला.

मिलींद देवगांवकर

◆

अंतरंगी कोंडलेल्या वादळांचे निर्बंध खोल
उठ वेड्या, जाग आता, आज तू हल्ला बोल!

रक्त आणि आसवांचे कधी तू मागशील मोल
उठ वेड्या, जाग आता, आज तू हल्ला बोल!

हिंस्त्र श्वापदी नेत्यांनी पुरले तुला जमिनीत खोल
उठ वेड्या, जाग आता, आज तू हल्ला बोल!

उचल ते खड्ग हाती, माग भवानीला कौल
उठ वेड्या, जाग आता, आज तू हल्ला बोल!

अरे हा तुझाच नारा, अरे ही तुझीच ओळ
उठ वेड्या, जाग आता, आज तू हल्ला बोल!

मिलींद देवगांवकर




FIFTH THIRD BANK





6445 SOM Center Road
Solon, OH 44139
440-248-1850
Member FDIC

Happy Diwali & Prosperous New Year
With Best Wishes



Best Compliments & Wishes
For A Happy Diwali
and
Prosperous New year.





SUNNY'S ASIAN FOOD & SPICES,
SOLON, OFF ROUTE 91



दिपावली
अभिष्ठचिंतन





इंदिरा व संजय पालेकर
आणि पालेकर परिवार

## अरे संसार संसार –

– कौस्तुभ लेले

संत बहिणाबाई किती सोप्या शब्दांत सांगून गेल्या ***अरे संसार संसार जसा तवा चूल्ह्यावर । आधी हाताला चटके तेव्हां मिळते भाकर ॥***

आपण जगांत पाहतो तर कुणाला नुसते संकटांशी झुंजावे लागते, तर कुणाला भोगांच्या अतिरकाने अपचनाची दुखणी सहन करावी लागतात. कुणाला खडकावर गाढ झोप लागते, तर कुणाला मऊ बिछान्यावर तळमळत पडण्यावाचून गत्यंतर नसते.

विचार केल्यावाचून राहावत नाहीं कीं ***असं कां*** ? पण त्याआधी प्रश्न पडतो की हे चटका–भाकरीचे नाते नीट लक्षांत घेऊन आणि सदोदित लक्षांत ठेवून संसार सांभाळायचा कसा ? अर्थात खाऊन–पिऊन सुखात असणे, मुलाबाळांनां वाढवणे एवढेच संसाराचे सार असेल तर असे संसार तर कुत्री–मांजरी, कावळे–चिमण्याही करतात. त्यांच्यात व माझ्यात फरक तो काय? प्रसिद्ध श्लोक आहे

***आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ।***
***धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ॥***

*खाणें, झोपणें, भीति व कामभोग हे स्वभावतः मानव आणि पशु दोन्हीचे असतात. त्यांनां (मानवांनां) धर्म हा एक विशेष आहे (कीं ज्या) धर्माशिवाय (मानव) पशुसमान आहेत.* येथून आणखीच प्रश्न उद्‌भवतात. कोणता धर्म ? कोणाचा धर्म ? कोणी ठरवायचा धर्म ? एक ना अनेक, आणि तेही वादग्रस्त. खरं की नाही ? आणि ***वादग्रस्त*** या शब्दांतच नेमके मानवाचे पशूंहून वेगळेपण दिसते.

म्हणतात कीं पशुपक्षांची भाषा असते. कुणाची म्यांवम्यांव तर कुणाची चिवचिव. पण आपली भाषा ही भाषा आहे हे पशूंनां समजल्याचे ऐकिवात नाही. भाषा कृमी–कीटकांनाही आहे. पण भाषा असण्याचे भान हे केवळ मानवाला असते. आणि नुसते शब्द कानांनी ऐकावेत या पलीकडे जाऊन कागदावर उमटवावेत म्हणजे लिहावेत, व डोळ्यांनीं पाहावेत म्हणजे वाचावेत, इतकेच नाही तर स्पर्शानेही उमजावेत (पाश्चात्यांनीं निर्मिलेली ब्रेल लिपी) ही किमया मानवाचीच. या सर्व किमयेचे साधन बुद्धि ही पण मानवी. **बुद्धि असण्याचीही जाणीवसुद्धा मानवीच**.

खाद्यपदार्थ विस्तवावर भाजावा ही एक पायरी. त्या भाजण्यानें पदार्थ शिजतो हे समजणे ही पुढची पायरी बुद्धीचीच ना? विस्तव आणि पदार्थ यांच्यामध्ये तवा ठेवून तापलेल्या तव्यावर वेगळ्या प्रकारे शिजवण्याची प्रक्रिया ठरवणे ही तर याच्या खूपच पुढची मजल. हे एकमेकांस शिकवता येणे ही आणखी वरची भाषेची पायरी. आणि या पाककृतीत हाताला बसणाऱ्या चटक्याची उपमा आयुष्याला द्यावी ही प्रतिभेची पायरी. फक्त मानवी. पण मानवाची तरी एकच भाषा आहे कां? दर दोन कोसांवर भाषा बदलते असं म्हणतात. पण अतिशयोक्ति सोडली तरी आपल्या शेजारच्या प्रांतात भाषा वेगळी असते. दोन माणसांची एकमेकांनां राहू दे, आपली भाषा देवाला तरी कळेल ना ? नाही तर कांही तरी भलतेच व्हायचे. या कल्पनेच्या कां भीतीच्या योगें करून तुकाराम महाराजांनी देवाला विनवलें

***कानडीने केला म्हराटा भ्रतार । एकाचे उत्तर एका न ये ॥ तैसे नको करू मज कमळापति । देईं या संगति सज्जनांची ॥ तिनं पाचारिलं इलं बा म्हणोन । येरु पळे आण आली आता ॥ तुका म्हणे येरा येरा ते विच्छिन्न । तेणे वादे शीण सुखापोटी ॥*** (तु.गा. ६२)

तुकाराम महाराज देवाला सांगतात कीं अशी भाषेच्या गैरसमजुतीची वेळ, देवा, तुझ्यामाझ्यात न येवो. बायको *इलं बा* (इकडे ये) म्हणून बोलावते आहे आणि नवरा दूर पळतो आहे तिनें आपल्याला *बाबा* म्हणजे वडील म्हटलें म्हणून. महाराज विनवतात की,
माझी अशी दशा नको करू, *देवा, मी जे मागतो ते नीट समजून मला योग्य ते दे.* अर्थात विवाहितांसाठीं खास शालजोडीतला आहेच.

हे झाले भाषा या मानवी वैशिष्ट्याबद्दल. विज्ञान हे मानवाचे दुसरे वैशिष्ट्य. कशाहीविषयीं ***असं कां*** याच्या भौतिक पातळीवरच्या शोधातून उभे झाले ते विज्ञान, कीं ज्याला माउलींनीं म्हटले आहे आवश्यक असे प्रपंचज्ञान. या शोधांत असणारा ***मी*** कोण याच्या उत्तराच्या शोधातून उभे झाले ते अध्यात्म आणि याच्या उत्तराला माउलींनीं म्हटले आहे ज्ञान, म्हणजे आत्मज्ञान. या सर्व प्रकारच्या शोधांत निर्माण होतात वाद – म्हणजे संवाद, विवाद, वितंडवाद, वगैरे. हे आहे मानवी वैशिष्ट्य. हे संक्षेपानें मांडण्याचा उद्देश इतकाच की मनुष्याला एक विलक्षण कुतूहल आहे, म्हणूनच ***धर्म*** आहे. जे दिसते त्यामागचा कार्यकारणभाव (science) समजून घेण्याची इच्छा आहे. ते समजल्यावर आपल्या आयुष्यात त्याचा उपयोग (technology) करून घेण्याची इच्छा व शक्ति दोन्ही आहेत. आणि एकमेकांनां कळवण्याची खुमखुमी आहे, जिथे भाषा कामी येते.
पाश्चात्य देशांत विज्ञानाची वाटचाल झाली तिला इतिहासांत (recorded history) तोड नाही. आणि भारतांत अध्यात्माचा विचार ज्या सातत्यानें झाला आणि त्यांतून जी योगपरंपरा निर्माण झाली आहे तिलाही तोड नाही. आतां जितक्या हिरीरीनें सर्व जग विज्ञानाचा पाठपुरावा करीत आहे तितक्याच उत्साहानें जग योगमार्ग शिकू आणि आचरू पाहात आहे. पण योगाचा अभ्यास अजून तरी शरीराचे स्वास्थ्य, मनाची शांतता या अशा जीवनांतल्या उपयुक्ततेतच अडकला आहे. ते असो. योगाची संसारात योजना आयुष्य सुखानें जगण्यासाठीं होते ही गौण गोष्ट झाली. हा जगणारा आणि भौतिक ज्ञान असणारा ***मी*** कोण हे जाणण्यासाठी योगाचा पुढचा अभ्यास. या अभ्यासाचीही खूपच वर्गवारी आहे, अगदी बिगरीपासून Tenured Professor पर्यंत. आणि ती समजावून घ्यायला संत काय म्हणतात हे समजून घ्यायला हवे. ते कधी स्पष्टपणे, तर कधी संकेतानें सांगतात, आणि कधी परखड शब्दांत. महाराज म्हणतात

***धन मेळवूनि कोटी । सवे न ये रे लंगोटी ॥ पाने खाशील उदंड । अंती जासी सुकल्या तोंडे ॥ पलंग न्याहाल्या सुपती । शेवटी गोवऱ्या सांगाती ॥ तुका म्हणे राम । एक विसरतां श्रम ॥*** (तु.गा. २९५९)

*या विषयात* Tenured Professor *म्हणजेच संत हे लक्षांत आले असेल.* समर्थ रामदासांनी ***प्रपंच करावा नेटका*** असं सांगून ठेवलं आहे. पण नेटका म्हणजे तरी काय आणि ते ठरवायचं कोणी? संसार म्हटला कीं देहाचे व्यवहार आहेत, त्यासाठी पैसा मिळविणं आलंच, त्याबरोबर भोगही आहेतच कीं नाहीं? त्यात कांही प्रमाणांत स्वार्थ असणे स्वाभाविक आहे. तेव्हां समर्थांनी सांगितलेला ***विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी ।*** किंवा ***देहेबुद्धि हे आत्मबुद्धि करावी ।*** हा उपदेश आचरणांत आणायचा कसा?

माणसाला भीती असते कीं ज्याच्या अस्तित्वाचीही माहिती नाही त्याच्या (आत्मज्ञानाच्या) शोधांत भटकल्यास ***तेल गेलं तूप गेलं हाती धुपाटणं आलं*** अशी अवस्था नको व्हायला. अगदी अक्षरशः हाच प्रश्न अर्जुनानें गीता–संवादांत विचारला होता (गी. ६:३७–३८). आणि असे प्रश्न विचारणें आणि उत्तरांचाही मागोवा घेणे ही सुद्धां योगमार्गाची वाटचाल आहे.

एकीकडे पाहावे तर अनेक, नव्हे जवळ जवळ सर्वच, संतांनी निक्षून सांगितले आहे कीं हा संसार म्हणजे माया आहे. सुखदुःख, मानापमान, वगैरे सर्वच केवळ भ्रम आहे आणि आत्मज्ञान झाल्यावर, आणि ते तसे झाल्यावरच, याविषयीची खात्री पटते. पण संतांवर जरी दृढ विश्वास असला तरीही त्या ज्ञानाची मजल गाठेपर्यंत वाटचाल याच संसारांत करायची ना ? बहिणाबाईने यासाठीं सावध करायला एक सुचवले आहे कीं ***अरे संसार संसार खोटा कधी म्हणू नये । राऊळाच्या कळसाला लोटा कधी म्हणू नये ॥***. देवळाचा कळस जरी लोट्यासारखा दिसला तरी तो कळसच असतो, त्याला लोटा म्हणायचे नसते. या रूपकानें बहिणाबाई सुचवते कीं संसाराला खोटा (भ्रम, माया, वगैरे) कधी म्हणू नये, म्हणजे किमान आपण सामान्य लोकांनीं तरी. तात्पर्य, असे म्हणायला हरकत नाहीं कीं "संसार म्हणजे केवळ माया आहे" याचा गहन अर्थ निश्चित कळल्याशिवाय संसाराला माया, भ्रम, वगैरे म्हणणें हा एक भ्रमिष्टपणाच नाही कां? आणि असेही वाटते कीं संसार केवळ माया वा भ्रम असता तर धर्मसंस्थापनेचा खटाटोप करायची श्रीकृष्णाला गरजच काय?

तुकाराम महाराजांनी साधूची ओळख ***जे कां रंजले गांजले तयांसी म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा ॥*** अशी गोड शब्दांत दिली. आणि साधुवेषांतल्या भोंदूंचे पितळ उघडे केले ते असे

***गाजराची पुंगी । तैसे झाले नवे जोगी ॥ काय करोनी पठन । केली अहंता जतन ॥ अल्प असे ज्ञान । अंगीं ताठा अभिमान । तुका म्हणे लंड । त्याचे हाणोनि फोडा तोंड ॥ तु.गा. २०७५॥*** ढोंगी, भोंदू यांची अत्यंत कठोर शब्दांत निर्भत्सना नामदेव–तुकाराम–रामदास यांनी आणि सर्वच संतांनीं केली आहे. आणि म्हटले आहे कीं संतांची संगति ही ऐहिक सुखाकरता आशीर्वाद मिळवायला नसावी. आणि ऐहिक सुखाची लालूच दाखवणाऱ्यांपासून सावध रहायला हवे, विशेषतः कुटुंबियांनी.

आणि संतसंगति धरून अभ्यास कशाचा करायचा, कोणता गृहस्थधर्म पाळायचा हे सोप्या शब्दांत सांगतात – ***पुण्य परउपकार पाप हे परपीडा । आणिक नाही जोडा दूजा दूजा यासी ॥ सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म । आणिक हे वर्म नाही दूजे ॥ गति तेचि मुखी नामाचे स्मरण । अधोगति जण विन्मुखता ॥ संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळ । तुका म्हणे आहे उघड हितघात । जयाचे उचित करा तैसे ॥*** (तु.गा. ३३१३)

अध्यात्म म्हणजे संसार कसाबसा सांभाळून उरल्या वेळात करायचा उद्योग नाही. संसारच कसा योगमय करता येतो याचे हे वर्म आहे.

पुढील पानावर....

ईशान्य ओहायोच्या
मराठी मंडळींना



# दिपावली
## अभिष्टचिंतन

**मोहन आणि जयश्री दुर्वे**
**आणि**
**दुर्वे परिवार**



## अरे संसार संसार –

– कौस्तुभ लेले

आणि ज्यानें त्यानें आपापले हित समजून वागावे ही मुभा दिली आहे. हिंदुधर्माचे एक वैशिष्ट्य आहे की धर्मानुसार वागलेच पाहिजे ही बळजबरी नाही, आग्रह नाही. अर्थात मग अनुचित कर्माचे अनुचित फळ भोगण्याची तयारी असावी. समर्थ म्हणाले ***मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले। तयासरिखे भोगणे प्राप्त झाले॥***

गीतेत वेगवेगळ्या प्रकारे योगी, भक्त, नित्यसंन्यासी अशी आत्मानुभवी व्यक्तीची ओळख दिलेली आहे. त्यावर निरूपण करतांनां माउली अनेक दृष्टांत देतात, व त्यांतूनच मार्गही सुचवतात. बाराव्या अध्यायात ***अद्वेष्टा सर्वभूतानां*** हे समजावतानां म्हणतात

***उत्तमाते धरिजे अधमाते अव्हेरिजे। हे कांहींच नेणिजे वसुधा जेवी॥ ज्ञा. १२:१४५॥*** (गी. १२:१३) वसुधा म्हणजे पृथ्वी उत्तम-अधम यांनां सारखाच आधार देते, आणि या समभावाची वसुधेला जाणीवही नसते, तो स्वभावच असतो. तसे ज्ञानाच्या अवस्थेला पोहोचलेले योगी भक्त सर्वांनां जवळ करतात व सन्मार्गाकडे वळवतात.

आणि योगी अवस्था लाभेपर्यत काय करावे याचे मार्गदर्शन ओवीच्या पहिल्या ओळीत दिले आहे. चांगल्या संगतीत प्रगति करून घ्यावी अधोगतीकडे वळवणारी वाईट संगत टाळावी. समर्थ रामदास ***सदा संगती सज्जनाची धरावी।*** हे पुन्हापुन्हा आवर्जून सांगतात.

दिवाळी हा अत्यंत आवडता सण. खास फराळ व खाणेपिणे, नवे कपडे-दागिने घेणे, नातेवाईक व मित्रांसह आनंदीआनंद असा असतो हा सोहळा. मात्र आपल्यात एक वाक्प्रचारही आहे की ***साधुसंत येती घरा तोचि दिवाळी-दसरा.*** या वाक्प्रचाराचा उगम ठाऊक नाही. पण महाराजांनी हे कसे लिहिले आहे पहा.

***धन्य आजि दिन। झाले संतांचे दर्शन॥ झाली पापातापा तुटी। दैन्य गेले उठाउठी॥ झाले समाधान। पायी विसावले मन॥ तुका म्हणे आले घरा। तोचि दिवाळी दसरा॥*** (तु.गा. ५९२)

संसारांत धन मिळवणे-सांभाळणे हे आहेच, व त्याला योगक्षेम म्हटले आहे. या योगक्षेमाबरोबर पतिपत्नीसंबंध आणि सर्वच इंद्रियांचे काम भोग आलेच. अध्यात्मविचार करतांनां हा एक भेडसावणारा, होय भेडसावणाराच, प्रश्न असतो. हे सर्व संसारसुख सोडूनच 'अध्यात्म करावे लागते' कां? याविषयी विभूतिरूपानें ***धर्माच्या विरुद्ध नसणारा काम तो मीच आहे*** असे श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितले.

***धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ॥ गी. ७:११॥***

यावर निरूपण करतांनां माउली म्हणतात

***भूतांच्या ठायी कामु। तो मी म्हणे आत्मारामु। जेणे अर्थास्तव धर्मु। थोरु होय॥ एरव्ही विकाराचेनि पैसें। करी कीर इंद्रियांचि ऐसे। परी धर्मासि वेखासे जावो नेदी॥ जो अप्रवृत्तीचा अव्हांटा। सांडूनि विधीचिया निघे वाटा। तेवीचि नियमाचा दिवटा। सवें चाले॥ कामु ऐसिया वोजा प्रवर्ते। म्हणोनि धर्मासि होय पुरते। मग मोक्षतीर्थीचे मुक्ते। संसारभोगी॥ ज्ञा. ६:४६-४९॥*** *भूतमात्रांच्या ठिकाणी अर्थार्जन करून धर्माचा विपुल संग्रह करणारा जो शुद्ध काम - वासना - आहे, तो म्हणजे आत्मस्वरूपांत रममाण होणारा मीच आहे (४६). हा शुद्ध काम जरी सामान्यतः विकारांच्या प्रवाहानुरूप इंद्रियतृप्तीचे कर्म करतो, तरी तो इंद्रियांनां धर्माविरुद्ध जाऊ देत नाही (४७). हा काम कर्मसंन्यासाची आडवाट सोडून, विधियुक्त कर्माचरणाच्या राजमार्गाला लागतो, आणि नियमितपणाची मशाल याच्याबरोबर नेहमी असते (४८). अशा सावधपणे काम व्यवहारू लागला, म्हणजे धर्माची पूर्तता होते, आणि मग संसाराचा उपभोग घेणारे पुरुषही मोक्षतीर्थाचे मुक्तजन होतात (४९).* (बा. अ. भिडे यांच्या ***सार्थ ज्ञानेश्वरी*** *ग्रंथांतून*).

एकंदरीत संसार उत्तम जगणें, याविषयीं संतांनां आक्षेप नाहीं, पण आपले मनुष्यपण जनावरासारखे तेवढ्यापुरतेच जगणें याची मात्र त्यांनां सदैव खंत असते. ते, म्हणजे संत, आणि भाष्यकारही, ***तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्यच*** (गी. ८:८) हा गीतोपदेश विविध प्रकारे समजावून सांगत आले आहेत. माउलीनीं हरिपाठांत म्हटले आहे ***असोनी संसारी जिव्हे वेगु करी।*** तेच संत नामदेवांनी असे लिहिले आहे

***शेवटली पाळी। तेव्हां मनुष्य जन्म। चुकलिया वर्म। फेरा पडे॥***
***एक जन्मी ओळखी। करा आत्मारामा। संसार सुगम। भोगू नका॥***
***संसारी असावे। असोनी नसावे। कीर्तन करावे। वेळोवेळां॥***
***नामा म्हणे विठो। भक्ताचिये द्वारी। घेऊनिया करी। सुदर्शन॥***

**असा असावा गृहस्थाश्रम –**

**सानंदं सदनं सुताश्च सुधियः कान्ता मनोहारिणी।**
**सन्मित्रं सधनं स्वयोः स्थितिरिति चाज्ञापराः सेवकाः।**
**आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मृष्टान्नपानं गृहे।**
**साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः॥**

*घरात आनंदी वातावरण आहे, मुलेबाळे सुबुद्धि आहेत, पत्नी मन वेधून घेणारी आहे, सन्मित्र आहे तो सधनही आहे, स्वतःची (आर्थिक) स्थिति ठाकठीक आहे, सेवक आज्ञाधारक आहेत, रोज शिवपूजन व आतिथ्याचे आचरण आहे, शुद्ध व रुचिकर खाणेपिणे आहे, आणि सज्जनांची संगति आहे, असा गृहस्थाश्रम धन्य होय.*

**श्रीमती सुनंदा केशव लिमये** यांच्या सौजन्यानें

**॥ शरद ॥**

लाल केशरी फिकट जांभळी
त्यातच लपली हिरवी पाने
वनदेवीची रंगपंचमी
नटून सजली सगळी राने ॥ १

वृक्षांची आनंदी सळसळ
डोलत हलक्या वाऱ्यावरती
गिरक्या घेऊन हळवी पाने
अलगद पडती गवतावरती ॥ २

करड्या मार्गी दो बाजूंनी
शरदाच्या रंगांची उधळण
त्यावर झिलई सोनेरी
कलत्या सूर्याची पखरण ॥ ३

सरसर चढुनी फांदीवरती
खार हळूच डोकावून पाही
लुसलुशीत हिरव्या गवतामध्ये
ससुल्या भित्रा लपून राही ॥ ४

रेंगाळत अजुनी फुले उमलती
फूलपाखरे त्यांवर झुलती
ती पकडाया पाय चिमुकले
खेळ सोडूनी त्यां मागे पळती ॥५

शीळ, पुकारा, पक्ष्यांची गाणी
पुष्करिणीवर निथळते पाणी
कारंजावर नाजुक थरथर
इंद्रधनुची चमकती वेणी ॥ ६

पहा, पूर्ण तो चंद्र उगवला
रातराणीही झाली जागी
मंतरलेली धुंद यामिनी
भोवताल घे कवेत वेगी ॥ ७

आकांक्षांचा वसंत फुलला
ना उसंत गंभीर उन्हाळा
तृप्त शांत या वळणावरती
हो संमुख, बघ काळ थांबला ॥ ८

पायतळी पाचोळ्याची चुरचुर
अंगावर किंचित ये शिरशिर
श्वासामधुनी हवा हवासा
सुखद गारवा शोधे अंतर ॥ ९

हात तुझा हाती माझ्या
आश्वासक, उबदार साथीला
निसर्ग खुलला मनी उमटला
निःशब्द बोलका संवाद चालला ॥ १०

– श्रीकांत लिमये

## कर्ता करविता —रवि गांवकर

देव आहे या गोष्टीवरती जरी आपला संपूर्ण विश्वास असला तरी अधून मधून त्याचा आपल्याला विसर पडूं शकतो. त्यामुळे त्याची आठवण पण तो देवच आपल्याला करून देत असावा. असावा नव्हे तो पदोपदीं तशी आठवण करतोच याची मला खात्री आहे. आणि याची अनुभूती देणारे काही प्रसंग हल्लीच माझ्या आयुष्यात घडले.

नुकत्याच प्रकाशित झालेल्या डीव्हीडी आणि पुस्तकाच्या कामाची मी २००८च्या मध्याला सुरुवात केली. तीनचार महिन्यात डीव्हीडीचा कच्चा आराखडा पण तयार झाला. खरं म्हणजे एक सोडून पांच—सहा डीव्हीडी बनतील एवढं साहित्य तयार होतं. खर्चाच्या दृष्टीनं डीव्हीडीचं शूटिंग पुण्याला करायचं ठरवलं. पुण्यातल्याच एका सिनेमाटोग्राफरची (शेलार) इथूनच निवड केलेली होती आणि त्यानंच एका डायरेक्टरचं (जोशी) नांव सुचवलं होतं. नोव्हेंबरच्या अखेरीस मी पुण्यात रुजू झालो. शक्यतो माझी मुलगी ऋजुता आणि तिचा नवरा विवेक यांनी त्या डीव्हीडीत काम करावं अशी माझी इच्छा होती म्हणून डिसेंबरच्या अखेरीस त्यांना पण पुण्याला बोलवून घेतलं.

मी यापूर्वी असं प्रॉजेक्ट केलेलं नसल्यामुळे शेलार आणि जोशी यांच्याच सल्ल्याप्रमाणे बरंचसं काम होणार होतं. त्यामुळे पुण्यात पाय ठेवल्याबरोबर त्यांना पहिल्यांदा भेटलो. मी बनवलेली स्क्रिप्ट बघताच दोघानाही धक्काच बसला! जोशींचा सल्ला मिळाला की पहिल्याप्रथम सहा तासांची स्क्रिप्ट ६०—६५ मिनिटांवर आणली पाहिजे. एक आठवड्यात ते काम पूर्ण झालं. मग डीव्हीडीमध्ये माझ्याबरोबर काम करण्यासाठी साउन्ड—स्टुडिओ मध्ये आठ—दहा उमेदवारांची चांचणी होवून अखेरीस दोघांची निवड करण्यात आली. माझ्या आवाजाची पण चांचणी होवून "तुमचा आवाज खर्जांत असून पक्का आहे" अशी ग्वाही मिळाली. या सर्व कामासाठी आठवड्यातून तीन—चार दिवस तरी मीटिंग्ज व्हायच्या. हे सर्व पार पडता पडता डिसेंबरचा शेवट आला. ऋजुता आणि विवेक पुण्यात उगवले सुद्धा. परंतु...

याचवेळीं शेलार आणि जोशी यांनी अजून एक धक्का दिला! त्यांनी त्यांच्या दोन अटी जाहीर केल्या: पहिली अट: सर्व संस्कृत श्लोक पाठ पाहिजेत, म्हणजे पुस्तकात न बघता अस्खलित म्हणता आलं पाहिजे. दुसरी अट: पूजेच्या वेळी अधून मधून पुस्तकात बघितलेलं चालेल परंतु व्हीडीयोमध्ये चष्मा चालणार नाही. म्हणजे पुस्तक डोळ्यांसमोर असूनही वाचता येणार नव्हतं! याचा अर्थ व्हिडिओ शूटिंग अजून कमीत कमी पंधरा दिवस तरी सुरू होणार नव्हतं. परिणामी ऋजुता आणि विवेक यांना त्यामध्ये सहभागी होणं अशक्य होतं कारण ते दोघं दोन जानेवारीलाच अमेरिकेत परतणार होते. मग उगीचच एका नातेवाइकांच्या घरी एकत्र येऊन त्या दोघांचं थोडंस रेकॉर्डिंग झालं. त्याचा वापर कुठे करायचा ते पुढे ठरवायचं होतं.

पुढच्या पंधरावीस दिवसात बरीच चर्चा झाली आणि सर्व व्हिडिओग्राफी निसर्गरम्य गोव्यात करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे पुण्याहून सिनेमाटोग्राफर शेलार आणि त्याचे दोन सहकारी, डायरेक्टर जोशी, मेकप आर्टिस्ट, माझ्याबरोबर संस्कृत श्लोक म्हणणारी एक मुलगी आणि मी असा सात जणांचा लवाजमा घेऊन भाड्याच्या गाडीतून सोळा जानेवारीला आम्ही गोव्यात आलो. केरी—फोंड्याजवळच असलेल्या विजयादुर्गा संस्थानाच्या अग्रशाळेत राहायची व्यवस्था केलेली होती. बरंचसं व्हिडिओ शूटिंग या देवळाच्या आसमंतांतच करायच ठरलं होतं. काही श्लोकांसाठी आमच्या वडिलोपार्जित घराची निवड केलेली होती. त्याशिवाय गोव्यातील एका अतिशय निसर्ग्यरम्य समुद्रकिनाऱ्याची निवड केलेली होती.

ज्यावेळी प्रत्यक्ष शूटिंग सुरू झालं त्यावेळी एकेक नवीन समस्या पुढे येऊ लागल्या. ज्यावेळी स्तुडिओबाहेर शूटिंग करतात त्यावेळी संपूर्ण शांतता लागते. देवळाच्या परिसरांत लोकांची सारखी ये—जा सुरू होती. त्याशिवाय कांहीतरी बांधकाम सुरू होतं, त्याचे पण आवाज येत होते. त्यामुळे संपूर्ण दिवसात दोन ते तीन तासच शूटिंगसाठी मिळायचे. त्याहीपेक्षा मोठी समस्या म्हणजे वर नमूद केलेल्या दोन अटी. आम्हां दोघांनाही अजून सर्व श्लोक पाठ नव्हते. मग जेवढे श्लोक पाठ होते तेवढ्याच श्लोकांचं रेकॉर्डिंग केलं आणि एक महिन्यानंतर रेकॉर्डिंगसाठी गोव्यात परत यायचं असं ठरवून पुण्याला परतलो.

पुण्यात पोचल्यानंतर दोनच दिवसात शेलारनी अजून एक वाईट वार्ता दिली ती अशी: गोव्यात केलेलं जवळजवळ सर्व शूटिंग बाद! कारण? तें रेकॉर्डिंग त्यानी आणि जोशीनी बघितल्यानंतर त्यांच्या असं लक्षात आलं की माझ्या बरोबर आलेल्या मुलीचे संस्कृत उच्चार आणि म्हणण्याची पद्धत त्या दोघांनांही पसंत नव्हती. मग याला जबाबदार कोण? आणि ही गोष्ट गोव्यातच पहिल्याच दिवशी त्यांच्या लक्षात यायला नको होती का? जास्ती विचार करता माझ्या डोक्यात प्रकाश पडला! डायरेक्टर जोशीनी आत्तापर्यंत तसं कांहीच काम केलेलं नव्हतं. नाहीतर या सर्व चुका झाल्या नसत्या. याचवेळी माझ्या बहिणीची नात, प्रार्थना जोशी, म्हणाली की ती डायरेक्टरचं काम करू शकेल. प्रार्थनानं नुकतीच आर्किटेक्चरची डिग्री घेतलेली होती परंतु तिचा कल 'फिल्म—मेकिंग'कडे होता. शिवाय ती एक बऱ्यापैकी 'आर्टिस्ट' पण होती. मग 'त्या' जोशींना डच्चू देऊन या 'जोशीला' डायरेक्टर म्हणून घेतली.

पुढच्या महिन्याभरात खूप गोष्टी घडल्या. पहिली गोष्ट माझ्याबरोबर श्लोक म्हणायला आता अपर्णा गुरवची (शास्त्रीय गायक आणि वीणा सहस्रबुद्धेची शिष्या) आणि निवेदक (Narrator) म्हणून शुमिता महाजन (कथ्थक डान्सर, शिक्षिका आणि धंदेवाईक निवेदक) यांची नव्यानेच निवड केली. दुसरी गोष्ट यापुढचं शूटिंग गोव्यात न करता पुण्याच्या आसपासच करायच ठरलं. शेलारांच्या ओळखीनं कॅप्टन सनत्कुमार भाटे (सुप्रसिद्ध कथ्थक डान्सर रोहिणी भाटे यांचे चिरंजीव) यांची पानशेत धरणाजवळची अतिशय सुंदर दहा एकरांवर पसरलेली एस्टेट शूटिंगसाठी मिळाली. त्यामुळे सगळं ओझं गोव्यात वाहून न्यायचा वेळ आणि खर्च वांचला. तिसरी आणि अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे प्रार्थनानं माझी स्क्रिप्ट घेऊन संपूर्ण ६५ मिनिटांच्या डीव्हीडीच्या शूटिंगचा आराखडा तयार केला. त्यात प्रत्येक सीनला 'बॅकड्रॉप' काय पाहिजे, 'लाइव्ह शूटिंग' नसेल तिथे कुठले सीन 'डाऊनलोड' केले पाहिजेत, कुठला श्लोक कुणी म्हणायचा, त्याला कपडे कुठले घालायचे वगैरे सर्व प्लॅनिंग (जे पहिल्या डायरेक्टरकडून अपेक्षित होतं) तिनं केलं. यावेळेचा फायदा घेऊन आम्ही सर्वांनी आपापलं पाठांतर करून टाकलं.

अशी सर्व जय्यत तयारी झाल्यावर मार्च तीनच्या पहांटे उठून आम्हा आठ जणांची टीम दोन गाड्यातून भाटे एस्टेटकडे निघाली. मी आणि अपर्णा शेलारांच्या गाडीत होतो आणि बाकी पांच जणं आणि सर्व सामान दुसऱ्या गाडीत होतं. अंतर फक्त चाळीस किलोमीटर परंतु रस्ता अतिशय खराब. त्यामुळे या प्रवासाला दोन तास लागले. तिथे पोचताच मी गाडीतून उतरून मुख्य दरवाजाकडे चालू लागलो. त्याचवेळी भाटेंच्या दोन अजस्त्र राखणदार कुत्र्यांनी भुंकायला सुरुवात केली. साहजिकच माझं लक्ष तिकडे गेलं आणि पहिल्या पायरीवर पाय ठेवायच्या अगोदरच घसरून मी त्या पायरीवर चक्क लोटांगण घातलं. क्षणार्धांत काय झालं याची जाणीव झाली. माझं नाक कॉंक्रीटच्या पायरीवर आपटून त्यांतून भळाभळा रक्त वहात होतं आणि त्याच वेळी थोडीशी शुद्ध पण जायला लागली होती. माझ्या चष्म्याचे पण अनेक तुकडे झालेले होते. शेलारांना काय घडलं हें लगेच समजलं. त्यांनी एस्टेटची काळजी घेणाऱ्या नोकराला—बंडूला—बर्फ आणायला लावला. अपर्णाकडे एक मो ा रुमाल होता त्यात बर्फ बांधून ते जखमेवर ठेवून दोन गाड्यांचा जथा जवळच्या गांवातील डॉक्टरच्या शोधांत निघाला.

**पुढील पानावर....**

## कर्ता करविता –रवि गांवकर

बंडूला गांवाची माहिती असल्याने दहाच मिनिटात आम्ही त्या खेडेगावांतल्या डॉक्टरकडे पोचलो. तोंपर्यंत रक्तस्त्राव थांबलेला होता. डॉक्टरनं जखम तपासली आणि स्वच्छ धुऊन त्यावर बॅन्डेज बांधलं आणि शेलारना मला पुण्यातील हॉस्पिटलमध्ये घेऊन जायला सांगितलं.

पुन्हा एकदा दोन तासांचा प्रवास करून दोन्ही गाड्या पुण्याला पोचल्या. मी पहिल्यांदा माझ्या नेहमीच्या डॉक्टरकडे जाऊन टिटॅनसचं इंजेक्शन घेतलं. एवढ्यात माझा भाचा सुनील जोशी तिथं पोंचला. तो मला हर्डीकर हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. पुढचे तीन तास तिथल्या 'सार्वजनिक इमर्जन्सी रूम!' मध्ये घालवले. मी 'एन–आर–आय' आहे हे कळताच माझी जास्ती कटाक्षानं चौकशी केली गेली असावी. बरेचसे रेसिडेन्ट्स मला बघून गेले. मी पडलो त्यावेळी माझे खालचे दांत वरच्या ओठात शिरून भली मोठी जखम झालेली होती. त्या ठिकाणी टाके घालावे लागले. हे सर्व आटोपल्यावर सुमारे दोन वाजता सुनील मला घरीं घेऊन गेला.

पुढचे तीन–चार दिवस मी "हे असं कां घडल?" यावर विचार करण्यात घालवला. नुसता हा अपघातच नव्हे परंतु डायरेक्टरची चुकीची निवड, ऋजुता–विवेकला डीव्हीडीमध्ये घेण्यात अपयश, गोव्यात केलेलं शूटिंग बाद होणं वगैरे, वगैरे. हीं सर्व संकटं अचानक माझ्या मार्गात येत होती. मी डायबेटिक असल्यामुळे ही जखम बरी व्हायला कमीत कमी दोन आठवडे, किंबहुना एक महिना, लागणार हे माझा अनुभव मला सांगत होता. तोपर्यंत माझी अमेरिकेत परत जायची तारीख जवळ आलेली असणार. त्यामुळे हे प्रॉजेक्ट इथंच ड्रॉप करावं असे पण विचार मनात अनेक वेळा येऊन गेले. संकटांच्या वेळी देवाची आठवण येते हे अगदी खरं आहे. मनात एक विचार असा येऊन गेला की कुठल्याही पवित्र कार्याला सुरुवात करण्या अगोदर विघ्नहर्त्या गणेशाची प्रार्थना करायची असते. मी ते पूर्णपणे विसरून गेलो होतो. भाटेंच्या एस्टेटच्या एका भिंतीवर हातांत त्रिशूळ घेतलेल्या गणपतीचा एक भला मोठा पुतळा आहे. त्या गणपतीची नजर पण तीक्ष्ण आहे. ती नजर आणि तो त्रिशूळ अनेक वेळा माझ्या नजरेसमोर येऊन गेले. माझ्या चुकांबद्दल तो गणपती मला शिक्षा करत असावा असे पण विचार अनेकदां मनात डोकावून गेले. परंतु मी खरोखरीच अशा गोष्टींवर विश्वास ठेवणारा आहे का? प्रत्येक नवीन कार्याला सुरुवात करतांना मी नेहमी गणपतीची प्रार्थना करत आलेलो आहे का? अशा अनेक विचारांनी डोक्यात काहूर माजवलं. शेवटी निर्णय घेतला कीं परत शूटिंगला सुरुवात करण्याअगोदर त्या त्रिशूळधारी गणपतीसमोर नारळ ठेवून प्रार्थना करायची आणि मगच शूटिंगला सुरुवात करायची.

पुढच्या काही दिवसात सर्व गोष्टी मनासारख्या आणि एवढ्या पटापट होत गेल्या कीं त्यावर माझाही विश्वास बसेना. बरोब्बर पाच दिवसात नाकावरची जखम बरी होवून खपली पडून गेली. त्याचप्रमाणे ओठावरची सूज पण निघून गेली. डॉक्टरांनी 'सर्व काही ठीक' चा शिक्का मारला. अपघात झाल्यानंतर बरोबर आठ दिवसांनी गणपतीला नारळ अर्पण करून शूटिंगला परत सुरुवात केली. पुढचे पांच दिवस तळपत्या उन्हात शूटिंग करण्यात घालवले. त्यानंतरचा एक आठवडा एडिटिंग करण्यात गेला. सर्व काही सुरळीत होवून गेलं. परंतु गेले कांही दिवस उन्हात घालवल्यामुळे नाकावर जिथे जखम झाली होती तो भाग लाल दिसू लागला. म्हणून पुढचे कित्येक महिने sun block cream लावून मी बाहेर जायचो, जे मला शूटिंगच्या वेळच्या कडक उन्हात लावावं लागलं नव्हतं! एप्रिल २००९ मध्ये अमेरिकेत परतल्यानंतर पुस्तक लिहून संपूर्ण करणं आणि डीव्हीडीची संपूर्ण छाननी करून त्यांतल्या उणीवा दूर करणं या कामात पण अमाप अडथळे आले. डीव्हीडीच्या प्रॉडक्शनला सुरुवात करायच्या वेळी लक्षात आलं की ती NTSC ऐवजी PAL format मध्ये बनवलेली आहे! मग ते Format बदलून घेण्यात बरीच धावपळ केली. बृहन्महाराष्ट्र मंडळातील काही स्वयंसेवकांचीही मदत मिळाली. हे सर्व अडथळे बहुतांशी माझ्या अज्ञानामुळे आणि प्लॅनिंगच्या अभावामुळे येत होते हे मला नंतर जाणवायचं. बऱ्याच वेळा प्रॉजेक्ट "DUMP" करण्याचे विचार पण मनात येऊन गेले. परंतु निर्धारानं काम सुरू ठेऊन अखेरीस या वर्षीच्या गणेश चतुर्थीला हे पुस्तक आणि डीव्हीडी यांचं साग्रसंगीत प्रकाशन झालं. प्रकाशन झालं म्हणजे काम संपलं नाही. याउलट छापलेल्या एक हजार प्रती लोकांपर्यंत पोचवण्याचे नानाविध मार्ग शोधून काढण्यात यापुढचे कित्येक महिने, नव्हे वर्षं, जातील. परंतु मी त्याची चिंता करत नाही. कारण आत्तापर्यंत घडलेल्या घटनांचा विचार करता माझी अशी खात्री झालेली आहे की या सर्व गोष्टी माझ्या हातून करून घेणारा 'कर्ता–करविता'च मला पुढचा मार्ग दाखवणार आहे. एवढंच नव्हे तर याच विषयावर अजून काही डीव्हीडी प्रकाशित करण्याचा मार्ग पण तोच दाखवणार आहे.

## अहंकार (EGO)

अहंकार या (अव)गुणी नाण्याच्या दोन बाजू आहेत. तो थोडासा असणं ही पहिली बाजू. तिला "अस्मिता" असं पण म्हणतात. तो शिगोशीग भरून वाहणं ही दुसरी बाजू. तिला "गर्व", "अहंकार", "मीपणा" अशीं अनेक नांवं आहेत. पहिल्या बाजूची माणसाला जगण्यासाठी जरुरी असते. किंबहुना माणसाची स्वतःची, समाजाची आणि देशाची उन्नति त्यामुळे होवू शकते. दुसरी बाजू अंगात शक्यतो नसलेलीच बरी. कारण ती ज्या माणसांच्या नसानसांतून वहात असते अशा गर्विष्ठ माणसांपासून सर्वसाधारण माणूस दूर राहायचा प्रयत्न करत असतो. वरवरून त्या माणसाचा उदो उदो होत असला आणि समाजांत त्याला वरकरणी प्रतिष्ठा मिळत असली तरी मनांतल्या मनांत लोक त्याला टाळायचाच प्रयत्न करत असतात.

अहंकारी व्यक्ती नेहमी "मी यंव केलंय मी त्यंव केलंय," अशा वल्गना करत असते.
एवढंच नव्हे तर "मी हे सर्व single-handedly केलंय" अशी गैरसमजूत पण अशा व्यक्तीनं करून घेतलेली असते. वरवरची स्तुती त्यांच्या "Ego"ला खतपाणी घालत असते. जेवढी जास्ती स्तुती तेवढा हा अहंकाराचा वृक्ष मोठा!

याउलट कांहीं व्यक्तींचा "मी एकटी काय करूं शकणार, हे सर्व तुमच्यामुळे मी करू शकले" असा स्थायीभाव असतो. या व्यक्ती आपल्या हातून जे काही घडतं ते देवानंच घडवून आणलेलं आहे अशा भावनेनं जगत असतात. शिवाय आपल्याला मिळालेल्या यशांत आणि आनंदांत, ज्यानी ज्यानी त्याना मदत केलेली असते, अशा सर्वांना सामावून घेण्याचा त्या प्रयत्न करत असतात.

आपण कुठल्या प्रकाराकडे झुकतोय याचा प्रत्येकानं विचार करावा आणि आपल्या स्वतःच्या जडणघडणीत कुणाकुणाची आपल्याला मदत झालेली आहे त्याचं विस्मरण होवू देवू नये. पदोपदीं याची स्वतःला जाणीव करून द्यावी.

ज्योतीच्या वाचकांना माझं एक आवाहन आहे. प्रत्येकानं पुढचे ३–४ आठवडे विचार करून आपल्या आयुष्याच्या शिल्पकारांच्या आणि आधारस्तंभांच्या आठवणी लिहून काढाव्यात आणी त्या दिवाळी अंकासाठी पाठवून द्याव्यात. याचा दुहेरी फायदा होईल. एकतर "ज्योती"ला साहित्य मिळेल आणि तुमच्या मनांत दडलेला साहित्यिक बाहेर येवून अपल्यांतल्या अ–लेखकांचे लेखक बनतील. शिवाय तुमची लोकांना जवळून ओळख होईल हे "ICING ON THE CAKE!"

**रवि गांवकर**

Happy Diwali

and

Best Wishes for the New Year


from

Sandhya and Dr. Krishna Deshpande

and


Family







From

Dravid Family



With best wishes

from

Deoras Family

## सरस्वतीचं देऊळ

**– श्रीकांत लिमये**

पृथ्वीतलावर आपला, म्हणजे मनुष्यप्राण्याचा, इतिहास सुमारे चार लाख वर्षांचा आहे. काही शेकडा हजार वर्षे इकडे तिकडे. इतक्या वर्षांच्या जीवजाती सातत्याने टिकवण्यासाठी होणाऱ्या स्पर्धेमधे आज पर्यंत सातत्याने विजय मिळवणाऱ्या मनुष्याच्या यशाचं रहस्य त्याला लाभलेली बुद्धिमत्ता आहे. हे सर्वसाधारणपणे मान्य झालेलं आहे. जीवरक्षणासाठी लागणाऱ्या, दचकणे, प्रतिक्षिप्त क्रिया देणे, भोवतालाशी जुळवून घेणे इत्यादि गोष्टी तर त्याच्याकडे कमी अधिक प्रमाणात आहेतच. तथापि, ज्ञानेंद्रियांकडून मिळणाऱ्या माहितीचे संकलन, संग्रहण, विश्लेषण, आकलन, संपादन आणि वर्तमान तसेच भविष्यातील निर्णय घेण्यासाठी त्याचा संदर्भ म्हणून उपयोग करणे या सर्वांमधे इतर प्राण्यांपेक्षा तो वरचढ असण्याचा त्याला निश्चितच फायदा झालेला आहे.

मनुष्याचा आणखी एक विशेष, जो क्वचितच इतर प्राणीजातींमधे आढळतो, तो म्हणजे वेगवेगळ्या कामांसाठी लागणारी साधनं (हत्यारं/Tools) बनवण्याची त्याची क्षमता हे आहे. काही चिम्पॅन्झी आणि कप्युचिन्स् जातीच्या माकडांमधेही काही विशिष्ट कामांसाठी अगदी प्राथमिक प्रकारची साधनं वापरण्याचं ज्ञान असल्याचं दिसून आलं आहे. पण मनुष्याचं विशेष हे की त्यानं साधनं तर बनविलीच. पण साधनं बनवणारी साधनं सुद्धा बनविली. यामुळे तो टिकून राहण्याच्या (Survival)च्या स्पर्धेमधे इतर प्राण्यांपेक्षा केवळ एक पाऊलच नव्हे तर दहा पावलं पुढे राहात आला आहे. उदाहरणार्थ अग्नि आणि चाक यांचा केवळ शोध आणि वापरच नव्हे तर, त्यांचं नियंत्रण करण्यासाठी लागणारी साधनं आणि ती साधनं बनवण्यासाठी लागणारी साधनं सुद्धा मनुष्याने बनविली.

हे जरी खरं असलं तरी मनुष्याचं या स्पर्धेमधलं यश आणि त्याने एकूणच केलेली प्रगती यां मागचं महत्त्वाचं कारण सर्वसाधारणपणे दुर्लक्षितच राहातं. किंवा, असं म्हणता येईल की, ती गोष्ट आपल्याला इतकी नेहेमीची आणि स्वाभाविक आहे, की ते ध्यानातच येत नाही. माणसाच्या यशाचं, सातत्यानं प्राणीजाती म्हणून टिकून राहण्याचं, त्यानं केलेल्या देदिप्यमान प्रगतीचं, बुद्धिमत्ते नंतरचं प्रमुख आणि, माझ्या मते, एकमेव कारण आहे ते म्हणजे त्याने विकसित केलेली भाषा. अभिव्यक्तिचं एक प्रमुख साधन म्हणून तर भाषा महत्त्वाची आहेच. नुसतं प्रमुख साधन म्हणून नव्हे तर जे काही सांगायचं आहे, अभिव्यक्त करायचं आहे ते अगदी नेमकेपणानं आणि अचूक व्यक्त करतां येईल अशी शक्ति भाषेमध्ये आहे. याही पुढे जाऊन, खरं सांगायचं तर, जे काही व्यक्त करायचं आहे त्याचा, त्या संदर्भातला आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टींचा विचार नीटपणे करणे हे केवळ आणि केवळ भाषेमुळेच शक्य आहे. भाषे बद्दल इतका उच्च दावा (टॉल क्लेम) केलेला कदाचित तुम्हाला आवडणार नाही, म्हणजे पटणार नाही. पण क्षणभर काहीही विचार करून बघा. काहीही कशाला, हाच विचार करता येतो का बघा. आपापल्या कुवती प्रमाणे कमी अधिक प्रमाणात तुम्हाला ते सहज शक्य झालं. आतां, तुम्हाला कोणतीही भाषा येत नाही असं समजून हाच किंवा इतर कुठलाही विचार करा. तुमच्या लक्षात आलंच असेल की ते शक्य होत नाही. आपण विचार करतो तेव्हा आपोआप आपण आपल्या सवयीच्या भाषेतच विचार करीत असतो.

हे गंमतीशीर वाटलं तरी खरं तर भीतीदायक आहे. कारण, असं जर असेल तर आपण सारे इथपर्यंत तरी कसे आलो? ह्याचं उघड उत्तर म्हणजे भाषा हळुहळु निर्माण आणि विकसित होत गेल्या. जगातलं सर्वात प्राचीन वाङ्मय म्हणजे आपले वेद. वेदकाल निर्णयावर मतभेद असले तरी ते सर्वात प्राचीन आहेत यावर दुमत नाही. अर्थात मुद्दा तो नाही. वेगवेगळ्या मतांपैकी सध्या आपण असं समजू की सुमारे २०,००० वर्षांपूर्वी वेदांचं आकलन (ते अपौरुषेय आहेत अशी सर्वसाधारण समजूत आहे) झालं. वेदांचे जे ऋषी आहेत त्यांची भाषा ही आर्षभाषा आहे. ते आजचे संस्कृत नव्हे. त्यावर संस्कार होऊन संस्कृत भाषा विकसित झाली. अशाच इतरही भाषा एकमेकीं सोबत अथवा वेगवेगळ्या विकसित झाल्या आणि आजही होत आहेत. त्याही पूर्वी विचार, अभिव्यक्ति अन् संवाद कसा होत असेल? ही प्रगती बहुधा निव्वळ हातवारे, खाणाखुणा आणि चेहेऱ्यावरचे हावभाव, नंतर केवळ कंठातून निर्माण होणारे स्वर यांनी झाली असेल. त्यानंतर त्यात भर पडली असेल फक्त उद्गारांची. सुरुवातीला भरपूर गोंधळ होत असेल आणि मग हळूहळू काही बाबतीत प्रमाणीकरण (Standardization) झाल्या नंतरच काही अर्थपूर्ण संवदाची शक्यता निर्माण झाली असेल. आजही त्या त्या क्षेत्रातल्या विशिष्ट गोष्टी/कल्पना विशिष्ट शब्दांनीच स्पष्ट केल्या जातात की जेणे करून त्याचा अर्थ अगदी अचूकतेने सांगितला जाईल. काही प्रमाणात नैसर्गिकपणे आणि बऱ्याच प्रमाणात आवश्यकतेनुसार अशा भाषा विकसित केल्या गेल्या. ही मानवाची मोठी उडी आहे ज्यामुळे तो विविध क्षेत्रात भरारी घेऊ शकला.

एकूण जे ज्ञान मिळवता येणे शक्य आहे त्याचा आवाका, काळाचा अथांगपणा आणि त्यापुढे मानवी जीवनाच्या आयुष्यमर्यादेची अगदीच त्रोटक, जवळ जवळ नगण्य, परिमिति पाहता हे त्रैराशिक उघड उघड मानवाच्या विरुद्ध जाणारे आहे. ह्याचे काय करावयाचे? ही समस्या मानवाच्या लगेच लक्षात आली असेल असे नाही. बराच काळ इतर प्राण्यांप्रमाणे जगण्यासाठी अगदी आवश्यक तेवढे ज्ञान वा माहिती ही एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे "दिली" गेली असणार. (नाहीतर हा लेख लिहायला मी आणि तो वाचायला किंवा नुसताच ओलांडायला तुम्ही इथे नसतो.) हे बहुधा शिकण्याच्या सर्वश्रेष्ठ पद्धतीने, म्हणजे निरीक्षण आणि अनुसरण याने झाले असावे. पण खरी समस्या, जेव्हा ही माहिती वाढत जाऊन त्याचे नुसते जगण्यापुरतेच नव्हे तर जीवन अधिकाधिक समृद्ध करण्याच्या ज्ञानात रूपांतर झाले तेव्हा "आता याचे काय करायचे?" म्हणजे, आता हा साठा पुढील पिढ्यांना मिळेल आणि उपयोगात आणता येईल अशी काय व्यवस्था करता येईल, ही उद्भवली असणार.

यावर निरनिराळ्या मानव समुहांनी निरनिराळी उत्तरे शोधली. ही प्रामुख्याने तीन प्रकारची आहेत असं मला वाटतं. एक म्हणजे यासाठी मनुष्याचाच उपयोग करणे, दोन, काही पदार्थाचा त्याकरता वापर करणे आणि तीन, आज विज्ञानाला न समजणाऱ्या किंवा हे विज्ञानाला समजत नाही इतकं समजलेली पद्धत वापरणे. यापैकी तिसरा प्रकार नक्की काय आहे हेच समजत नसल्यामुळे ह्या लेखाच्या, खरं तर लेखकाच्या, कक्षेबाहेरचा विषय आहे. शिवाय चौथा/पाचवा प्रकार कदाचित असेलही पण ती पद्धत वापरणारे समुह टिकले नसावेत निदान आज तरी दिसत नाहीत आणि माहितीतही नाहीत.

यावर हिंदुंनी शोधलेलं उत्तर म्हणजे पाठांतर. मानवी बुद्धिमत्तेची पाठांतराची आश्चर्यकारक क्षमता लक्षात आल्यावर ही युक्ति सुचली असणार. त्या त्या वेळी महत्त्वाचे असलेले ज्ञान कंठस्थ करून पुढच्या पिढीला ते कंठस्थ करायला लावण्याची योजना झालेली दिसते. ज्ञान कायम स्वरूपी टिकवण्याची ही युक्ति तर खरीच तथापि अख्खी संस्कृति नष्ट करणाऱ्या अमानुष, क्रूर जमाती भावीकालात होतील हे कालदर्शी ऋषींना कळले नाही असे तरी कसे म्हणावे? ही पद्धती प्रभावी मात्र नक्कीच आहे. आजही वेद आणि उपनिषदं त्यांच्या मूळ स्वरूपात टिकलेले दिसतात. घनपाठाच्या विशेष पद्धतीमुळे त्यात भेसळ होण्याची, स्वतःच्या चार ऋचा घुसडण्याची शक्यता राहिली नाही असे दिसते. या पुढे ते टिकतील की नाही याचे उत्तर ते आज आणि या पुढे जीवन समृद्ध करण्यास किती उपयोगी असतील (ठरतील असे वाटेल) यावर अवलंबून आहे. कॅलक्युरेटर हाताशी आल्यावर आतां वर्गमूळ काढण्याची पद्धत शाळेत शिकवली जाण्याचीच आवश्यकता वाटत नाही, यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल असे वाटते.

हीच पद्धती कदाचित काही इतरांनी वापरली असेल पण आज आपल्याला निश्चित माहिती आहे ती भारतीयांनी वापरली याची. अन्यत्र अभिव्यक्तीची निराळी पद्धत आढळते. उदाहरणार्थ गुहेमध्ये सापडली रंगवलेली चित्रे. ही अभिव्यक्ती असली तरी अगदी **पुढील पानावर....**

## सरस्वतीचं देऊळ

प्राथमिक स्वरूपाची आहे. त्यात नुसती शिकार करण्याची घटना दाखवलेली नसून कदाचित त्या मागची व्यूहरचना दाखवली असेल तर त्याला काही महत्त्वपूर्ण संदेश म्हणता येईल. पण आणखी विकसित झाल्यावर अन्यान्य मार्गांनी ते संदेश किंवा माहिती/ज्ञान कायम स्वरूपी साठवण्याच्या इतर पद्धती वापरल्या गेल्या.

बॅबिलॉनमध्ये (चिकण)मातीच्या पातळ विटांवर लेखन केले गेले. हे सर्वात प्राचीन लेखन समजले जाते (जे आज उपलब्ध आहे). माती ओली असताना खाचा पाडून "अक्षरे" उमटविली जात आणि मग ती विट भाजल्यावर ते लेखन कायम होत असे. अशा विटांवर सरकारी आज्ञा, हिशोब तसेच आयकर भरल्याच्या नोंदी आढळून आल्या आहेत.

ईसवी सना पूर्वी सुमारे ३००० वर्षे, ईजिप्तमधे हेरोग्लिफिक्स् (पवित्र कोरलेल्या खुणा)चा वापर सुरू झालेला दिसतो. दगडावर, (सामान्यपणे सॅण्डस्टोन) काही खुणा कोरून काढल्या जात. या खुणा म्हणजे जणु चित्रलीपी. त्या खुणाही अशा की वाचताना उच्चारल्यावर तो "शब्दच" उच्चारला जावा.

इजिप्शियनांनीच पुढे लिखाणा करिता वर उल्लेखिलेल्या चिकणमातीच्या विटांपेक्षा "पॅपिरस" (आज परिचयाचा असलेल्या "पेपर" या शब्दाचे मूळ हे आहे) अधिक पसंत केला. नाईल नदीच्या परिसरात उगवणाऱ्या या झाडांच्या खोडातील रेषाळ गाभा बाहेर काढून चांगला मळला आणि लाटला जात असे. त्याचे पातळ थर त्यातल्या रेषा–तंतूंमुळे सलग एकत्र राहतात. असे दोन थर एकमेकांच्या काटकोनात ठेवून घ दाबले की लिहिण्यायोग्य, बऱ्यापैकी सपाट/गुळगुळीत कागदासारखा पदार्थ तयार होतो. यावर लेखन करणे निश्चितच सोपे होते. शिवाय ही पॅपिरस झाडे नाईल जवळ मुबलक होत असल्यामुळे पुरवठ्याचाही प्रश्न नव्हता. असे "कागद" एका पुढे एक चिकटवून त्याची गुंडाळी (Scroll) केली जात असे. ही हाताळायला आणि सांभाळायला नक्कीच सोईची होती. चिकणमातीच्या विटांपुढे पॅपिरसचा एक दोष मात्र होता तो म्हणजे पॅपिरस टिकाऊ नव्हते. नैसर्गिक आणि मानव निर्मित संकटात ते टिकू शकले नाही. तुलने करिता हे पहा की, संशोधकांना फारच थोडे पॅपिरस सापडलेले आहेत तर वर उल्लेखिलेल्या विटा सुमारे चार लाख सापडल्या आहेत.

पॅपिरस हा फक्त ईजिप्तमधे बनत असे. स्पर्धेमधे सरशी मिळविण्यासाठी ईजिप्तने एशिया मायनरला पॅपिरस निर्यात करण्याचे बंद केले. परिणामी एशिया मायनर मधल्या पर्गाममध्ये लेखनाचे माध्यम म्हणून नविनच पदार्थ आणि तंत्र शोधले गेले. त्यांनी मेंढी–बकऱ्यांची कमावलेली कातडी लिहिणाकरिता वापरण्याची पद्धत विकसित केली आणि "पार्चमेण्ट"चा वापर सुरू झाला. पार्चमेण्ट पॅपिरसपेक्षा खूपच गुळगुळीत असे आणि ते शाई सुद्धा अधिक चांगल्या प्रकारे ग्रहण करी. त्यामुळे अक्षर लेखना बरोबरच सुंदर चित्रे आणि नक्षी काढणे शक्य झाले. शिवाय पॅपिरस पेक्षा पार्चमेण्ट किती तरी अधिक टिकाऊ होते. हेच पार्चमण्ट जर उत्तम दर्जाचे असेल तर त्याला "व्हेलम" म्हटले जाते.

भारतामधे विटांवर खाचा पाडून, दगडावर कोरून (शिलालेख), भूर्जपत्रांवर आणि ताडपत्रावर लेखणीने, नारळाच्या झावळ्यांच्या पट्ट्यांवर कोरून माहिती/ज्ञान साठवण्याची पद्धत प्रचलित होती. याची साधारणपणे आपल्याला सर्वांना कल्पना आहेच. त्यामुळे त्याचा एवढा उल्लेख पुरे.

चीनने दोन महत्त्वाचे शोध लावले. ईसवी सनाच्या दुसऱ्या शतकात चीनमधे लाकडाच्या लगद्यापासून "कागद" बनवण्याचा शोध लागला आणि लवकरच त्याचे तंत्र आणखी प्रगत होत गेले. इतर माध्यमांपेक्षा हे "नविन" माध्यम खूपच सोईचे आणि त्या मानाने पुष्कळच टिकाऊ होते. अर्थात आग आणि पाण्यापुढे मात्र विटाच अधिक टिकतील हे उघडच आहे.

दुसरा क्रांतीकारी शोध चीनमधे लागला तो म्हणजे दगडावर अक्षरे कोरून त्याच्या "ठशाने" कागदावर अक्षरे उमटवण्याचे तंत्र. मुळात दगडाला शाई फासून त्यावर कागद दाबून धरून अक्षरे उमटविली जात. यामुळे पार्श्वभूमी शाईच्या रंगाची आणि अक्षरे मात्र "पांढरी" असा प्रकार होता. तरीही माहिती/ज्ञान टिकवण्याच्या (विसरू नका, हे सगळं त्यातून सुरू झालं) प्रयत्नांच्या दृष्टीने ही एक मोठ्ठी उडी मानवाने मारली. आठव्या शतका पर्यंत चीनमधे अक्षरांचे लाकडी ठोकळे बनवून ते वापरून कागदावर छपाई करण्याचे तंत्र चांगलेच विकसित झाले होते. उदाहरण म्हणून पहा, दहाव्या शतकात "त्रिपिटिका" हा बुद्धसंप्रदायातला महत्त्वाचा ग्रंथ ५००० खंडांमधे (की ५००० प्रति?) छापला गेला. त्यासाठी थोडे थोडके नाहीत, तर १३०,००० ठोकळे वापरले गेले होते.

अकराव्या शतकापर्यंत चीनने जागा बदलता येतील आणि चौकटीत बसवता येतील असे ठोकळे बनविण्याचे आणि त्या योगे छपाई करण्याचे तंत्र शोधून काढले. त्यानंतर दोन शतकांमधेच, तेराव्या शतकात कोरियाने आणि पाठोपाठ जपानने धातूपासून असे "छाप" (ठोकळे) बनवण्याची पद्धत शोधून काढली आणि त्याच्या भट्ट्याही उभारल्या. अर्थात हा नविन प्रकारचा "छाप" पटकन प्रचारात आला नाही. या नंतरसुद्धा लाकडी ठोकळे काही शतके वापरात राहिले.

हुश्श! एकदाची टिकाऊ स्वरूपात माहिती/ज्ञान जतन करण्याची व्यवस्था झाली. पण एका बाजूला ही सोय झाली आणि लगेच पुढचा प्रश्न आला की हे सगळं ठेवायच कुठे? आणि कसं? मानवाने जशा समस्या उत्पन्न झाल्या तशी त्यावर उतरेही शोधली. अगदी सुरुवातीपासूनच असं "ज्ञान" साठवण्यासाठी विशेष जागा शोधल्या गेल्या, निर्माण केल्या गेल्या आणि "ग्रंथालयं" निर्माण झाली. लायब्ररी ह्या प्रचलीत शब्दाचे "Liber" हे लॅटिन मूळ ज्याचा अर्थ आहे पुस्तक. किंवा काही भाषांमध्ये लायब्ररीला समानार्थी शब्द आहे तोही "Bibliotheke"शी संबंधित आहे. बिब्लिओथिक म्हणजे जिथे पुस्तके ठेवली जातात ती जागा आणि याचे मूळ आहे ग्रीक "Biblion" म्हणजे मगाशी पाहिलेल्या पॅपिरसची गुंडाळी (Scroll).

अर्थात अशी आद्य ग्रंथालयं आज तुमच्या डोळ्यासमोर येतील तशी नव्हती कारण आद्य "पुस्तकं" सुद्धा आज आपण ज्याला पुस्तकं म्हणतो तशीं नव्हती. आठवतंय ना, सुरुवातीची पुस्तक म्हणजे होत्या चिकणमातीच्या विटा! पण काय कमाल आहे, जेव्हा ही पुस्तकं प्रचलीत होती, तेव्हाच्या या "लायब्ऱ्या" उत्खननात सापडल्या आहेत. उत्तर सीरियामधे एल्बाजवळ त्यातली सर्वात जुनी, ईसवी सनापूर्वी २,५०० वर्षांची लायब्ररी सापडली. भिंतीतल्या खणांमधे नीट लावून ठेवलेल्या या "पुस्तक" विटा आढळून आल्या. त्याहूनही विशेष म्हणजे त्या नीट वर्गवारीकरून "विषया" प्रमाणे लावून ठेवलेल्या होत्या! त्याही पाच पन्नास नव्हेत तर चांगल्या २०,००० विटा त्या लायब्ररीत सापडल्या. ही तर नुसती झलक झाली. सर्व जगभर मानवाने ही पुस्तकं, मग त्या विटा असोत की पॅपिरस/पार्चमेण्टच्या गुंडाळ्या असोत, ताडपत्री, भूर्जपत्री असोत की मय संस्कृतीतले प्रचंड शिलालेख असोत नीट ग्रंथालयांमध्ये जपून ठेवली. एल्बासारख्याच प्राचीन लायब्ऱ्या निनेव्हपाशी सापडल्या. अलेक्झांड्रियाची महाप्रचंड लायब्ररी तर जगप्रसिद्ध आहे (होती). गंमत म्हणजे एशिया मायनर मधल्या पर्गाममच्या लायब्ररीची "मोठे"पणासाठी स्पर्धा सुरू झाल्यावर ईजिप्तने निर्यात बंद केली हे आपण वर पाहिलेच आहे. मेक्सिकोत (मॅनी, टेनोच्तित्लान, टेक्सोको), ईजिप्त (अलेक्झांड्रिया, एड्फू, हेलिओपोलिस, लक्सर, थेबेस), एशिया मायनर (डेबिर, हटुशा, निसा(?), निनेव्ह), चीन (होपे, ह्युनान, लोयांग, तुन–हुएँग), इटली (पिसा, रोम, व्हिवारिअम्), ग्रीस (अथेन्स, डेल्फी, ऱ्होडस्), कोरिया (क्योंग), सीरिया (दमास्कस, एल्बा, पामिरा, उगारिट), पर्शिया (आजचा इराण) (एक्बाटाना, फिरोझ–अबाद, इस्ताख, नेस्स, निसिबिस(?)) अशा सगळीकडेच लायब्ऱ्या अभारल्या गेल्या. भारतात ज्योतिर्मठ (काश्मीर), तक्षशिला आणि नालंदा इथली ग्रंथालय भव्य आणि नीट राखलेली होती. ही तर प्राचिन/अर्वाचिन काळातली ग्रंथालयं. आधुनिक काळात जगभरात ग्रंथालयं आणखीनच फोफावली. त्यांच्या संग्रहाची व्याप्ती वाढली, तसेच त्यांच्या उपलब्धतेचाही विस्तार झाला.

**पुढील पानावर....**

## सरस्वतीचं देऊळ

उत्तमोत्तम ग्रंथालयं ही एखाद्या देशाची अन् समाजाची अभिमानाची बाब ठरू लागली. खाजगी ग्रंथालयं पूर्वीपासूनच होती. हौस म्हणून असू दे, स्पर्धा म्हणून असू दे किंवा ध्यास म्हणून असू दे, ज्यांनी ती उभारली त्यांनी सगळ्या मानवजातीवर उपकारच केले आहेत. आज आपल्याला सार्वजनिक ग्रंथालयांची सवय झाली आहे. प्रगत राष्ट्रांमधे एक मूलभूत गरज, व्यवस्था, म्हणून त्याकडे पाहिलं जातं. पहिलं सार्वजनिक ग्रंथालय किती पूर्वी स्थापन झालं असेल असं तुम्हाला वाटतं? काही अंदाज? तब्बल अडीच हजार वर्षांपूर्वी, ई.स. पूर्वी ५०० वर्षांपूर्वी. गीकांना हा मान जातो. अथेन्स आणि सॅमोस मध्ये या सुमाराला सार्वजनिक वाचनालयं चांगलंच बाळसं धरून होती. मुळात समाजातल्या फक्त उच्चभ्रू, प्रतिष्ठीत लोकांना किंवा राजे, सरदार–दरकदार यांनाच उपलब्ध असलेली ग्रंथसंपदा सामान्यांपर्यंत पोहोचू शकली.

ही मानवाची गरूड भरारी तर खरीच. पण हा प्रवास निष्कंटक आणि आरामदायी नक्कीच नव्हता. ग्रंथालयांचा अगदी आता आतापर्यंतचा इतिहास कष्टदायक, अंगमेहनतीचा, इतकेच नव्हे तर चक्क रक्तरंजित ठरलेला आहे. नुसती कल्पना करा की तुम्ही हातोडा अन् छिन्नी घेऊन ठोक ठोक करीत "पुस्तक" लिहिता आहात किंवा एखादा हिशोबाचा "कागद" लिहिता आहात. कसं वाटतय? आज नुसतं एक बटण दाबलं की हव्या तशा रंगीत/पाठपोट प्रति करून घेता येतात (शिवाय त्या स्टेपलही करून मिळतात). पूर्वी हातात लेखणी आणि शाईची दौत घेऊन मान मोडून एक एक प्रत "उतरवून" घ्यायला लागायची. (ज्या मनुष्याने कार्बन पेपरचा शोध लावला तो थोर मनुष्य होय). ग्रंथालयं पूर्वी सामान्यपणे चर्चेस्, मठ–मंदिरं, आश्रम आणि पुढे विश्वविद्यालयांशी (जी सुरुवातीला संप्रदायांशी संलग्न असायची) संबंधित असायची. देशावर परचक्र, आक्रमण आलं की त्याची झळ, मुद्दामून असो वा नसो, या ग्रंथालयांना लागायची. कित्येक ग्रंथालयं, जगभर, अशा युद्धांमध्ये ध्वस्त झाली आहेत तर कित्येक आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. याला इतिहास साक्षी आहे.

अशा परिस्थितीत ज्या सरस्वतीच्या पूजकांनी, भक्तांनी, मनापासून, कधी स्वार्थासाठी, कधी नि:स्वार्थीपणानं, चिकाटीने, कठोर परिश्रमांनी, जीवनव्रता सारखं संपूर्ण आयुष्य देऊन आणि कितीतरी प्रसंगी स्वत:चे प्राणही देऊन सरस्वतीची उपासना केली ते मानवश्रेष्ठ धन्य होत! आपलं सर्वांचं भाग्य हे की असे अनेकानेक अक्षरश: शेकडो सरस्वतीभक्त होऊन गेले. यापैकी प्रातिनिधिक म्हणून फक्त दोन उल्लेख आपण करूया. त्यापैकी एक सुमारे २,५०० वर्षांपूर्वीचा आणि दुसरा युरोपिअन पुनरुज्जीवनाच्या (Renaissance) सुमाराचा आहे. प्रागैतिहासिक काळापासून असे, वर म्हटल्या प्रमाणे, अनेकानेक भक्त होऊन गेले. अनुल्लेखाने त्यांचा अवमान करण्याचा हेतु नाही. पण सगळ्यांची यादी करणं तर शक्यच नाही. पाणिनी या महान सरस्वतीभक्ता विषयी दुर्दैवाने फारशी निश्चित माहिती उपलब्ध नाही. म्हणजे त्यांच्या कार्याविषयी आहे – ते भाषातज्ञ होते. पण पाणिनींचा जन्म कधी झाला, कुठे झाला त्यांचे एकूण आयुष्य कसे होते याची नक्की माहिती नाही. पाणिनी ई.स. पूर्व ३०० ते ई.स.पूर्व ७०० मध्ये होऊन गेले असावेत. सिंधुनदीच्या काठी शालतुलामध्ये ते जन्मले असावेत. वैयक्तिक माहिती फारशी नसली तरी पाणिनींनी सरस्वतीची अशी देदिप्यमान साधना करून ठेवली आहे की तीच त्यांची खरी ओळख ठरावी. पाणिनींनी आर्ष संस्कृत भाषेवर काम केले. त्यावरून ते वेदिककाल म्हणून जो ओळखळा जातो त्याच्या अखेरीस झाले असावेत. त्या भाषेला त्यांनी नियमात बांधले. त्यांच्या संस्कृताच्या व्याकरणाचा गाभा आहे त्यांचा जगप्रसिद्ध ग्रंथ "अष्टाध्यायी" (आठ धडे). अत्यंत गहन (Complex) असले तरी ते संस्कृतभाषेचे सर्वसमावेशक व्याकरण आहे आणि संस्कृताचेच नव्हे तर जगातील कुठल्याही भाषेच्या व्याकरणांमध्ये सर्वात छोटे आहे (फक्त ३९५९ सूत्रे!). या मधे त्यांनी शब्द कसे घडतात याचे शास्त्र आणि त्याचे नियम दिले आहेत. उच्चारशास्त्राचे नियम दिले आहेत. त्यात धातुकोष, शब्दकोषातून शब्द घेऊन त्यापासून (नवे) अर्थपूर्ण शब्द बनविण्याचे नियम आणि पद्धत दिली आहे. ही अतिशय तांत्रिक आणि व्यवस्थित, रचनाबद्ध अशी मांडणी आहे. शब्दाचा अर्थनिर्देश करणारा लहानात लहान भाग तसेच भाषेतील भिन्न तऱ्हेने लिहिला जाणारे पण एकच ध्वनि असलेले शब्द असे विषय यात अंतर्भूत आहेत. त्यांच्या बुद्धिमत्तेची झेप अशी की आज संस्कृताचे व्याकरण सर्वोत्कृष्ट आणि व्याकरणाच्या दृष्टीने संस्कृतभाषा निर्दोष/परिपूर्ण म्हणून ओळखली जाते. पंचतंत्रातील उल्लेखा प्रमाणे पाणिनी सिंहाकडून मारले गेले.


छपाईयंत्राचा जनक म्हणून थोर सरस्वतीभक्त जोहान्स गुटेन्बर्ग यांचं नांव निदान जो पर्यंत पुस्तकं/मासिकं छापली जातील तो पर्यंत तरी निश्चितच "अमर" राहील. जर्मनीतल्या मेंझमधे एका उच्चमध्यमवर्गीय सोनार/व्यापाऱ्याच्या कुटुंबात ईसवी सनाच्या चौदाव्या शतकाच्या अखेरीस यांचा जन्म झाला (ई.स. १३९८–ई.स.१४६८). यांचे वडिल निदान काही काळ टांकसाळीत कामाला होते (नंतर कापड व्यापारी असावेत). साहजिकच गुटेन्बर्ग सोनारकामाचे तंत्र शिकत, आत्मसात करीतच मोठे झाले. याचा त्यांना नंतरच्या कामात नक्कीच उपयोग झाला असणार. गुटेन्बर्गच्या लहानपण आणि सुरुवातीच्या आयुष्याची विशेष माहिती उपलब्ध नाही. यांना सोनारकामा शिवाय इतरही अनेक गोष्टींची माहिती होती असे त्यांच्या अनेक उद्योगांवरून दिसते. ई.स. १४४० च्या सुमारास स्ट्रासबर्गमध्ये त्यांनी छपाईच्या कलेचे संशोधन करून त्यात अचूकता आणली आणि त्याची रहस्ये जगापुढे आणली. गंमत म्हणजे "Art & Enterprise" या नावाखाली त्यांनी हे संशोधन केले. जागा बदलता येतील असे धातूचे छाप वापरून यांत्रिक पद्धतीने छपाई करण्याच्या शोधाचा मान गुटेन्बर्ग यांच्याकडे जातो. त्यांनी लाकडी ठोकळ्यांचा त्याग करून प्रत्येक अक्षराकरिता धातूचे छाप साच्यातून बनविण्यास सुरुवात केली. असे केल्यामुळे ही अक्षरं (छाप) जागा बदलून हवी तशी जुळवून घेता येऊ लागली. यामुळे एखाद्या मजकुराच्या कमी वेळेत हजारो प्रति करणे शक्य झाले. ई.स. १४५० पर्यंत छापाईयंत्र नीट काम करू लागले होते आणि त्यावर, बहुधा सगळ्यात पहिली, छपाई एका जर्मन कवितेची झाली. ई.स. १४५५ मध्ये त्यांनी सुप्रसिद्ध "गुटेन्बर्ग बायबल" प्रकाशित केले. याच्या सुमारे १८० प्रति, बहुतेक सर्व कागदावर अन् काही मोजक्या, व्हेलमवर छापलेल्या होत्या. गुटेन्बर्ग यांच्या ह्या शोधाचे महत्त्व अनेक वर्षे दुर्लक्षितच राहिले. या व्यवसायापासून त्यांना विशेष धनलाभही झाला नाही. गुटेन्बर्गच्या यांत्रिक छपाईच्या पद्धतीने छपाई क्षेत्रात क्रांती घडवून आणली. पुनरुज्जीवन, नवरचना आणि वैज्ञानिक क्रांतीमधे याचा सिंव्हाचा वाटा होता. यानेच आधुनिक, ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचा पाया घातला गेला आणि यामुळेच शिक्षणाचा प्रसार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचू शकला. तुम्हाला बहुधा माहिती असेलच की, A&E Networkने गुटेन्बर्गना "पीपल ऑफ द मिलेनिअम्" मधे अव्वलस्थानी निवडून तर टाईम साप्ताहिकाने गुटेन्बर्ग यांचे संशोधन दुसऱ्या सहस्रकातील सर्वात महत्त्वाचे संशोधन ठरवून गुटेन्बर्ग यांचा यथोचित गौरव केला आहे.

वर उल्लेखिल्या प्रमाणे सरस्वतीचे अनेकानेक उपासक होऊन गेले, ज्यांची आपल्याला माहितीही नाही. युरोपमधे मध्ययुगांत जेव्हा चर्चकडून पाखंडीपणा विरुद्ध सर्वांगीण चौकशी (The inquisition) होत असे तेव्हा त्या अनुषंगाने पाखंडीमत छापण्यास आणि ते उद्धृत करणाऱ्या पुस्तकांवर बंदी घातली गेली होती. त्यावेळी पुस्तकांवरील प्रेमाने, स्वत:चा जीव धोक्यात घालून (जिओर्डनो ब्रूनोचं काय झालं याचे उदाहरण त्यांच्या समोर होते तरीही. ब्रूनो हा इटालियन तत्त्वज्ञ, गणिती आणि खगोलशास्त्रज्ञ होता. "विश्वात्मक देवाची" त्याची संकल्पना पाखंडी मत आहे (असे) म्हणून रोमन इन्क्विझिशनने त्याला गुन्हेगार ठरविले आणि शिक्षा दिली. ब्रूनोला जिवंत जाळून ठार मारण्यात आले.) काही सरस्वती भक्तांनी ती पुस्तके चोरून हॉलंड किंवा व्हेनिसमधे नेली. उदाहरणार्थ, गॅलिलिओवरसुद्धा रोमन कॅथॉलिक चर्चची वक्रदृष्टी आली होती. त्याचे अखेरचे आणि सर्वात महत्त्वाचे पुस्तक "Discourses and Mathematical Demonstrations Relating to Two New Sciences" इटलीतून फ्रान्सला चोरून (Smuggle) नेण्यात आले आणि लेडनमधे प्रकाशित केले गेले (ई.स. १६३८). त्यामुळे ते विचार जगाला समजू शकले अन् पुनरुज्जीवनास खतपाणी मिळाले. त्यां पैकी काही कदाचित लक्ष्मीचेही भक्त असतील! पण त्यांनी दाखविलेलं धाडस आणि केलेलं काम अत्यंत महत्त्वाचं ठरलं. त्यांच्या "कामाच्या" स्वरूपामुळे इतिहासाला त्यांची नांवेही माहिती नाहीत.

आज एकूणच प्रकाशन, प्रसिद्धी, पुस्तकं–नियतकालिकं–वर्तमानपत्रं, ग्रंथालयं यांच स्वरूप कितीतरी बदललं आहे. सोईचं झालं आहे. कागद–शाई वरून आपण केव्हाच सिलिकॉन–इलेक्ट्रॉनिक्स् च्या माध्यमात जाऊन पोहोचलो आहोत. या पुढे भविष्यात ते कसे असेल? काळाच्या उदरात काय दडले असेल कुणी सांगावे? पण एक मात्र खरं की कोणत्याही स्वरूपात असली तरी ही ग्रंथालयं मानवी उत्कर्षाचा महत्त्वपूर्ण घटक असतील. ज्या ज्या देशांनी आणि समाजांनी ह्याचं मूल्य जाणलं ते देश आणि समाज आज प्रगत आहेत. या उलट ज्यांना याची किंमत कळली नाही, किंबहुना ज्यांनी याचा धि:क्कार केला ते देश आणि समाज मागासलेले राहिले. गेल्या वर्षी आमच्याकडे भारतातून पाहुणे आले होते. त्यांच्या जवळ क्लिव्हलंड साठी वेळ कमी होता. त्यामुळे काय "बघायचे" याचा विचार करताना कुणीतरी शिव–विष्णु मंदिर पहा असे सुचवले. मी त्यांना सांगीतलं की शिव–विष्णु मंदिर तर बघाच. पण क्लिव्हलंडमधे, क्लिव्हलंडच्या मानाने खूप भव्य आणि श्रीमंत असं एक सरस्वतीचं देऊळ सुपिरिअर आणि सिक्स्थ स्ट्रीटच्या कोपऱ्यावर आहे. ते सुद्धा तुम्ही बघा. तेवढाही वेळ नसला तर आमच्या या लहानश्या उपनगरातसुद्धा एक सरस्वतीचं देऊळ आहे तिथे तरी आपण नक्की जाऊयाच. इथे नाही तर अमेरिकेत तुम्ही पुढच्या ज्या नगरात जाल तिथे पहा. पण इतर आकर्षणां बरोबर ही देवळं अगदी नक्की बघा.

शांत परिसर आहे. झाडीच्या कोंदणात मोकळं आवार आहे. त्यात सरस्वतीचं भव्य देऊळ आहे. त्यात सभागृहामधे भक्तांना बसण्याची नीट सोय आहे. सभागृहाला लागूनच साधकांना चर्चा करायची असेल तर वेगळ्या खोल्या आहेत.

**पुढील पानावर....**





दिवाळी व नविन वर्षाच्या शुभेच्छा

**Sharad & Sushama Wankhade**

www.eswhealthcare.com

Ph: 330 321 7677




**with Best Wishes**

**from**

**Ashok, Sulu, Sumeet, Avneet & Ameet Patil**

### सरस्वतीचं देऊळ

आणि सोळा विद्या अन् चौसष्ट कलांनी देवी सरस्वती पुस्तकरूपाने गाभाऱ्यात विराजमान आहे. उपासकांच्या सोईसाठी विषयानुसार साऱ्या पुस्तकांची नीट मांडणी केलेली आहेत. ज्यांना दृक–श्राव्य माध्यमातून किंवा आंतरजालावरून अभ्यास करायचाय त्यांच्यासाठी तशी सोय आहे. जशी आवड तसा उपासना मार्ग. शिवाय सरस्वतीचे भक्त काही अडचण आल्यास किंवा मदत हवी असल्यास तत्परतेने मदतीला तयार आहेत.

असं एक सरस्वतीचं देऊळ, जिथे कल्पनेला पंख फुटतील, आकांक्षांना धुमारे फुटतील, लहान असो वा थोर त्याची जिज्ञासा जागृत होईल, बुद्धीला धार चढेल अन् मनाला समाधान मिळेल. असं एक सरस्वतीचं देऊळ माझ्या गांवी, माझ्या गावाला शोभेल असं, मला बांधायला आवडेल. तुम्हाला आवडेल?

**– श्रीकांत लिमये**

### मध्यमवर्गीय शहाजहान

डोक्यावरच्या छप्परासाठी आयुष्याचा "होम" मान्डणार्या सर्व मध्यमवर्गीयाना अर्पण

मुमताज तू माझी तुझा महाल बान्धायचा आहे
पण जमा आणि खर्च यान्चा दुवा सान्धायचा आहे

चोवीस कैरट प्रेम माझे अगदी शम्भर तोळा आहे
शिलकीच्या कानात मात्र आयकराचा बोळा आहे
सरकारी खजिन्याची तूट मी माझ्या "करा"नी भरतो
उद्याची वाट पहाण्यातच आजचा दिवस सरतो
कारण दिल्लीवर नसले तरी दिलावर राज्य माझेच आहे
शिळेपाके खाऊनही मनातले दु:ख ताजेच आहे
परवडेल तितक्याच प्रेमाचा नजराणा तुला द्यायचा आहे
पण जमा आणि खर्च यान्चा दुवा सान्धायचा आहे


खरच का ग ताज बान्धायला लागली होती वर्षे बावीस
मग मला वाटत निदान तितकी तुही मला मुभा द्यावीस
बैन्केतून मग होमलोन घेईन आयुष्याचा होम मान्डून
थोडे पैसे मालकाकडून थोडे विनवून थोडे भान्डून
शम्भर फुटी तीन खोल्यान्चा मग मोठा बान्धीन महाल
बावीस वर्षे हप्ते फेडून तोच तुला करीन बहाल
आनन्दाचा तो पल्ला मला क्षणात साधायचा आहे
पण जमा आणि खर्च यान्चा दुवा अजून सान्धायचा आहे

कर्जाच्या बोज्याखाली आता शहाजहान मरायचा आहे
मुमताज मिळाली एकदाच, हप्ता दर महिन्याला भरायचा आहे
करताना आपल्या भविष्याची चिन्ता त्याच्या कन्गव्याच्या खर्चात बचत आहे
पाहून जीवनाची सन्गमरवरी कबर "सहनशहा" मनात खचत आहे
पण प्रिये याची काळजी तू नको करु
सारे जग जिन्कू आपण थोडे जरी हरू
कारण हृदय आहे मोठे जरी खिसा असला लहान
प्रियकर आहे तुझा मध्यमवर्गीय शहाजहान
प्रियकर आहे तुझा मध्यमवर्गीय शहाजहान

**----जय मसुरेकर**

## ओळखीचे चेहरे, अनोळखी पैलू

(या अंकापासून हे नविन सदरं चालू करित आहोत. आपल्या माहितीतल्या लोकांच्या माहित नसलेल्या कामगिरीबद्दल लिहून पाठवा, छायाचित्रासहित....संपादक)



मी, सौ. विदुला खाडिलकर, माझे बाबा, नारायण ऊर्फ़ अप्पा परांजपे यांचे कॅरम नैपुण्य.

१९९८ पासुन कॅरम ह्या खेळात राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यात सुरुवात केली. १९९९ च्या अमेरिकेच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक. आता पर्यन्त झालेल्या कॅरम स्पर्धेत दुहेरीत तीन वेळा प्रथम क्रमांकात.

२०१० पर्यन्त सातत्याने पहिल्या चार ते सहा क्रमांक.
२००६ आणि २०१० साली झालेल्या वर्ल्ड कप मधे सहभाग.

२००५ मधे जुलै ३० व ३१ मधे डलस येथे सतत ३२ तास ४५ मिनीटे खेळून गिनेस बुक ऑफ रेकॉर्डस मधे स्थान मिळवले आहे. आता पर्यन्त हा कॅरम प्रथमच विक्रम समजला जातो.

दिल्ली येथे झालेल्या वर्ल्ड कप च्या स्पर्धेत दिल्लीच्या मेयर कडून भव्य स्वागत सत्कार.

रिचमंड व्हरजिनीया येथिल वर्ल्ड कप च्या समारोपात लाईफ़ टाईम अचिव्हमेन्ट ॲवार्ड देउन सन्मान.

आत्ता पर्यन्त झालेल्या सर्व १) फ्रान्स २) ॲटलान्टीक सीटी ३) कौलालमपुर ४) रिचमंड व्हरजिनीया ५) दिल्ली येथील इंटर नॅशनल मधे सहभाग.

क्रिकेट खेळात पुणे युनिर्व्हसिटी जिमखाना कडून दोन वर्ष भाग. प्रथम दर्जाच्या मॅचेस करिता झालेल्या क्रिकेटच्या अंपायरच्या परिक्षेत प्रथम क्रमांक.
रणजी करंडकच्या अंपायरच्या पॅनेल वर निवड. बिलियर्ड हा खेळ सुध्दा सातत्याने १६ वर्षे खेळले आहेत व अनेक अंतर्राष्ट्रीय बिलियर्ड खेळाडु बरोबर खेळण्याची संधी मिळवली आहे.




# Wishing you a Happy Diwali and Prosperous New Year

From
**Vidula Khadilkar MD**
**Pediatrician**
**Offices :** 5162 Broadway Avenue, Suite 4, Cleveland, OH 44127
and Marymount Medical Center, Suite 111, Garfield Heights 44125
**Phone:** 216 429 0077

## मी जिंकलो की मी हरलो.

**विलास देसाई**

बुध्दीबळाचा डाव खेळता पटावर मी हरवून बसलो
प्याद्याची चाल खेळता कळेना मी जिन्कलो की मी हरलो.
सरळ चालत तिरके मारत समोरच्या घरात वजीर बनलो
हेच कळेना मलाच की मी जिन्कलो की मी हरलो
उन्ट घोडे हत्ती यान्च्या तिरक्या अडीच आणि सरळ चाली
वजीराच्या ह्या स्वतन्त्र चाली चुकवत मी मजल गाठ्ली
दुसर्याना शह देता मी मलाच शह देउन बसलो
हेच माझे मला कळेना मी जिन्कलो की मी हरलो
सप्त समुद्र पार करुन मी बरीच मोठी मजल मारली
गरीबी सात योजने पाठी टाकून श्रीमन्ती हि जवळ सारली
किमत तीची मोठी मोजता बरेच काही गमवुन बसलो
हेच माझे मला कळेना मी जिन्कलो की मी हरलो.
तन्त्र पैसे कमावणे आणि गमावणे श्रीमन्तीचा मग मला अर्थ उमगला.
माणसे दुरावली प्रेमाचे शब्द गमावुन बसलो
हेच माझे मला कळेना मी जिन्कलो की मी हरलो.

## लाच

**विलास देसाई**

एका राजाकडे एक अधिकारी होता, तो फ़ारच भ्रष्ट होता. राजाच्या डोक्याला त्याचा फ़ारच मनस्ताप होता. हा अधिकारी मात्र फ़ारच हुशार होता, तो कधिच सापडत नसे, त्यामुळे राजा त्याला काढु पण शकत नव्हता. ह्या अधिकारयाच काय कराव हा राजाला प्रश्न सतावित होता. ह्या राजाचा प्रधान फ़ारच हुशार होता. त्याने राजाला एक युक्ती सांगितली, ह्या अधिकारीयास आपण समुद्रकिनारी बसवुया आणि येणा जाणार्या लाटा मोजावयास लावुया, तिथे काहीही कमाई नाही म्हणुन हा कंटाळेल आणि नोकरी सोडून जाईल. राजाला प्रधानाने सांगितलेली हि युक्ति पटली. राजाने हि युक्ति अमलात सुध्दा आणली.

झाल अधिकारी दुसर्या दिवशी पासुन कामास लागला लाटा मोजण्याच्या. त्या किनार्यावर नेहमी व्यापार्यांच्या गलबतांची ने आण चालू होती, गलबत येत आणि जात. झाल अधिकारी मोजताना व्यापार्यांनी पाहील. त्यांना उत्सुकता लागली की हा सरकारी अधिकारी लाटा का मोजत आहे, त्यांच्यात कुजबुज सुरु झाली. एका व्यापार्याने आपला माणुस पाठ्वला. व्यापार्याच्या माणसाने अधिकार्याकडे विचार्पुस केली की लाटामोजण्या मागचा राजाचा हेतु काय म्हणुन. त्या अधिकार्याने व्यापार्याच्या माणसास सांगितल की ह्या देशाचा राजा लवकरच तुमच्यावर पाणिप ी कर लावणार आहे. व्यापार्याच्या माणसाने त्यास कारण विचारल, त्यावर तो अधिकारी म्हणाला की ह्या समुद्रातुन जितकी गलबत येतात आणि जातात ती येताना लाटा घेउन येतात आणि लाटा परत घेउन जातात, त्यामुळे राज्यात पाणिटंचाई झाली आहे, म्हणुन कुणती गलबत जास्त लाटा घेउन येतात आणि कुणती गलबत जास्त लाटा घेउन जातात त्याची मोजदाद राजाने मला करावयास सांगितल आहे. जी गलबत कमी लाटा घेउन येतात व जास्त लाटा घेउन जातात त्यांच्यावर राजा जास्त कर लावणार आहे. झाल व्यापार्याच्या माणसाने हे व्यापार्यास सांगितल, ताबड्तोब व्यापार्याने आपल्या खिशात हात घातला अधिकार्यास पैसे द्यायला.

## दिवाळी पुराण आणि इतिहासातील

दिवाळीसंदर्भात असलेल्या गमतीदार माहितीने पुराणात तसेच इतिहासात आपले स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच हा सण एखाद्या विशिष्ट समूहाचा न राहता संपूर्ण राष्ट्राचा बनला आहे. दिवाळीविषयी काही रंगतदार व गमतीदार माहिती खालीलप्रमाणे:-

1. प्रभू राम रावणाचा पराभव केल्यानंतर अयोध्येला परततत असताना त्यांच्या वाटेवर लोकांनी दिवे लावून स्वागत केल्याचे त्रेतायुगात सांगितले आहे.
2. श्रीकृष्णाने अत्याचारी नरकासुराचा वध केल्यानंतर गोकुळवासियांनी आपला आनंद दिवे लावून व्यक्त केल्याची कथा प्रचलित आहे.
3. देवीने महाकालीचे रूप धारण करून राक्षसांचा वध केला होता. त्याचा वध केल्यानंतरही महाकालीचा क्रोध कमी झाला नव्हता, तेव्हा भगवान शंकराने स्वत: देवीच्या चरणी लोटांगण घातले. शंकराच्या शरीर स्पर्शाने महाकालीचा क्रोध शांत झाला. त्याची आठवण म्हणून लक्ष्मीची पूजा केली जाते. या दिवशी तिच्या रौद्ररूपाची पूजा करण्याची प्रथा आहे.
4. बळीराजाने आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्रैलोक्यावर विजय मिळविला होता. या विजयाने भयभीत झालेल्या देवांनी भगवान विष्णूची प्रार्थना केली. त्यांची प्रार्थना ऐकून विष्णूने वामन रूप धारण करून बळी राजाला तीन पायांत दान मागितले. विष्णूने तीन पायाने त्यैलोक्य घेतले. बळीच्या दानशूरपणामुळे प्रसन्न झालेल्या विष्णूने त्याला पाताळाचे राज्य देवून भू- लोकवासी त्याच्या आठवणीनिमित्त प्रत्येक वर्षी दिवाळी साजरी करतील असे आश्वासन दिले.
5. शिखांचे सहावे गुरू हरगोविंदसिंग बादशाह जहांगीरच्या कैदेतुन सुटून कार्तिक अमावस्येच्या दिवशी अमृतसरला आले होते.
6. दिवाळीच्या एक दिवस अगोदर म्हणजे चतुर्थीला श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला होता. यामुळे आनंदी झालेल्या गोकुळवासियांनी दुसर्‍या दिवशी अमावस्येला दिवे लावून आनंद साजरा केला होता.
7. इसवी सन पूर्व 500 वर्षापूर्वी मोहेंजोदडो येथे सापडलेल्या अवशेषांमध्ये एका मातीच्या मूर्तीनुसार त्याकाळी दिवाळी साजरी केली जात असल्याचे समजते. मूर्तीच्या दोन्ही बाजूला दिवे जळताना दिसून येत होते.
8. इसवी सन पूर्व 2500 वर्षापूर्वी गौतम बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या स्वागतासाठी लाखो दिवे लावून दिवाळी साजरी केली होती.
9. सम्राट विक्रमादित्याचा राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्याच दिवशी दिवे लावून जनतेने आनंद साजरा केला होता.
10. इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील कौटिल्य अर्थशास्त्रानुसार कार्तिक अमावस्येच्या दिवशी मंदिरात आणि घाटावर (नदी किनारी) मोठ्या प्रमाणात दिवे लावले जात असल्याचे सांगितले आहे.
11. अमृतसर येथील सुवर्णमंदिराचे बांधकाम दिवाळीच्या दिवशी सुरू झाले होते.
12. जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर भगवान महावीर यांनी दिवाळीच्या दिवशीच बिहारमधील पावापुरी येथे आपल्या शरीराचा त्याग केला होता. 'महावीर सवंत्' त्यांच्या दुसर्‍या दिवशी सुरू होते. त्यामुळे अनेक प्रांतातील लोक याला नवीन वर्षाची सुरवात मानतात. प्राचीन जैन ग्रंथात दीपोत्सवाचे वर्णन आहे. महावीर निर्वाणामुळे जी अंर्तज्योती कायमची विझून गेली होती, तिची कमतरता पूर्ण करण्यासाठी आपण बर्हिज्योतीचे प्रतीक म्हणून दिवे लावू या असे कल्पसूत्रात सांगितले आहे.
13. पंजाबमध्ये जन्मलेल्या स्वामी रामतीर्थ आणि महाप्रयाण या दोघांचा जन्म दिवाळीच्या दिवशी झाला होता. त्यांनी दिवाळीच्या दिवशी गंगाकिनारी स्नान करताना 'ओम' म्हणून समाधी घेतली होती.
14. महर्षी दयानंदांनी दिवाळीच्या दिवशी अजमेरजवळ समाधी घेतली होती. त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली होती.
15. मोगल सम्राट अकबराच्या काळात दौलतखान्यासमोर 40 गज उंच बांबूवर एक मोठा आकाशकंदील लटकविला जात असे. यावेळी बादशहा देखील दिवाळी मोठ्या आनंदाने साजरी करत असे.
16. मोगल वंशाचे शेवटचे सम्राट बहादुरशहा जफर दिवाळी सणाच्या रूपात साजरी करत असत आणि यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होत असत.
17. शहा आलम दुसरा याच्या काळात संपूर्ण शाही महाल दिव्यांनी सजविला जात असे आणि लाल किल्ल्यावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात हिंदू-मुसलमान सहभागी होत

## ऑळख

**– श्रीकांत लिमये**

तान्हुले अजाण
देसी स्तन्य त्यास
बाळा मुखी घास
भरविसी ॥ १

धरूनिया हाता
कित्ता गिरविसी
मज शिकविसी
मूळाक्षरे ॥ २

आकांक्षांची स्वप्ने
घडती प्रयत्ने
तुझ्या सोबतीने
जीवलगा ॥ ४

उत्फुल्ल निसर्ग
ऋजु मंद वात
हाती तुझा हात
प्रियतमा ॥ ३

संसाराची वेल
उमलले फूल
आनंद सकळ
ओसंडला ॥ ५

बोट धरूनिया
चालवले आधी
होसी काठी कधी
आधारासी ॥ ६

वाट खडतर
काटेकुटे फार
घेसी कडेवर
मायबापा ॥ ७

अनंत रूपांनी
मज सावरले
परी ओळखले
नाही तुज ॥ ८

देई मज ज~ज्ञान
देई मज भान
तुजसी दूरून
ओळखण्या ॥ ९

हिऱ्याविण तें कां
देखणे कोंदण
जरी ते सुवर्ण
कैसे शोभे? ॥ १०

घेई वेणू हाती
घाली रे फुंकर
घुमु दे सुस्वर
शब्दब्रह्म ॥ ११

उणावला वारा
शांत सरोवर
शोधितां अंतर
उजाडले ॥ १२

धवळल्या दाही
दिशा तेजे पाही
अंधाराचा नाही
मागमूस ॥ १३

मिठी तुझी माझी
ओलांडे आकाश
प्रकाशी प्रकाश
ऐसे झाले ॥ १४

Wishing You a Happy Diwali & a Prosperous New Year!

# B D S Financial Service Corporation

www.bdsfsc.com
*30405 Solon Road #16*
*Solon, Ohio 44139*

## Financial planning is for anyone Who wants to take control of their financial goals.

Let an independent financial advisor help you craft a plan that puts your interests and objectives first.
That's an approach that makes sense in these—or any—market conditions.

Call us today for **financial checkup** @ **440-248-5625**
Let us show you how we can help!

***Ashok Shendure***, *MS, MBA, CFP®, CEBS®, AIF®, RLP®*
***Rajanee Shendure***, *MBA, CFP®*
***Smita Samant***

PLANNING Pays Off!℠

Securities and advisory services offered through Commonwealth Financial Network, member FINRA/SIPC, a registered investment advisor.